◆ डिसेंबर २००४
◆ वर्ष चौथे
◆ अंक बारावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुस्तक परिचय** | |
| फ्रॉम रशिया विथ लव्ह : अनु. विजय देवधर | २० |
| अंतर-पर्व : डॉ. सुनीती अशोक देशपांडे | २६ |
| हसता हसता आरोग्य : अनु. दिगंबर गाडगीळ | ३० |
| **पुरस्कार** | ३५ |
| **श्रद्धांजली** | ४४ |
| **'अविक'बाल वाचनालयाची वाटचाल** | ४६ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ५० |
| **बालनगरी** | ५२ |

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षाची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## ग्रंथप्रसाराबाबत
## ग्रंथप्रदर्शनांचे बहुमोल योगदान

ग्रंथप्रदर्शन आणि ग्रंथजत्रा यांना पुस्तकांच्या प्रसाराच्या आणि वितरणाच्या दृष्टीने खास स्थान आहे. पुस्तकांच्या दुकानात जाऊन नवीजुनी पुस्तके बघणारे वाचक शहरात आढळतात; परंतु, लहान लहान गावी पुस्तकांची दुकाने कमी असतात, आणि असली तर त्यात प्रामुख्याने शाळा-कॉलेजची पुस्तके आणि धार्मिक पाकशास्त्र-ज्योतिष-व्यक्तिमत्त्वविकास - छंद आदी उपयुक्त विषयांवरची पुस्तके जास्त दिसतात. लोकप्रिय लेखकांची गाजलेली पुस्तके दिसतात. नवनवीन पुस्तके तेथे यायला वेळ लागतो. तसेच दुकानाची जागा सीमित असल्याने गच्च भरलेल्या शोकेसेसमधून आणि शेल्फमधून हवे ते पुस्तक शोधणेही अवघड जाते. दुकानदाराला अमुक पुस्तक आहे का असे विचारायचे आणि त्याने हो किंवा नाही म्हणून ग्राहकाला कटवायचे – असाच खाक्या दिसतो. त्यामुळे वेगवेगळी पुस्तके चाळून आपल्याला संग्रही असावे असे वाटणारे पुस्तक निवडण्याची, ब्राउझिंग करण्याची संधी कमी असते. क्रॉसवर्ड, इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, मनीज्, पाथफाइंडर पॉप्युलर बुक डेपो (पुणे) स्ट्रँड बुक स्टॉल (मुंबई) वगैरे दुकाने त्या मानाने मोठी आणि स्वहस्ते पुस्तके निवडायला वाव देणारी आहेत. तेथे बसून पुस्तके वाचताही येतात. परंतु. एकूणच अशा प्रशस्त जागा असणाऱ्या ग्रंथदालनांची संख्या मोजकीच दिसते.

हे सगळे सांगण्याचे कारण एवढेच की गावोगावी सध्या भरणारी ग्रंथप्रदर्शने आणि ग्रंथजत्रा रसिक ग्रंथप्रेमी वाचकांना मुक्तपणे हजारो पुस्तके बघण्याची, चाळण्याची आणि आवडलेली, वाचावीशी वाटणारी पुस्तके घेण्याची उत्तम संधी देतात. छोट्या बुक स्टॉलच्या मर्यादा अशा ग्रंथप्रदर्शनामध्ये व ग्रंथजत्रांमध्ये झुगारून दिल्या जातात. त्यामुळे निरनिराळ्या प्रकाशकांची, निरनिराळ्या विषयांवरची, जुनी-नवी पुस्तके, आकर्षक मांडणीमुळे आपले लक्ष वेधून घेण्यास सिद्ध असतात आणि आपण त्यांना स्पर्श करावा, त्यांची पाने चाळावी, ब्लर्बवरील मजकूर वाचावा, हे पुस्तक आपण वाचले, घेतले तर आपल्या ज्ञानात-आनंदात नक्की भर पडेल, आपले कुतूहल चाळवले जाईल अशी मनाची धारणा होते. त्याची किंमत आपल्या आटोक्यात असेल तर ते घेण्याचे मन होते.

...आपला आवडता विषय, आवडता लेखक, आवडता वाङ्मय प्रकार, पुस्तकाची निर्मिती मूल्ये, पुस्तकाबद्दल वाचनात आलेले अभिप्राय, त्याला मिळालेले पुरस्कार, त्याच्यावर झालेले वादसंवाद–वगैरे कितीतरी बाबी पुस्तक विकत घेताना आपल्या मनात येत असतात.



कुठून तरी आपले कुतूहल चाळवले गेलेले असते आणि एखादे पुस्तक नेमके त्या नाजूक जागी स्पर्श करते. मग ते पुस्तक घेण्याची चुटपूट लागून राहते. पुस्तक घेतले तरी ते लगेच वाचून होते, व्हावे असे नाही. कोणते पुस्तक कधी वाचून होईल हे सांगता येत नाही. त्या त्या वेळच्या गरजेप्रमाणे संग्रही असलेल्या पुस्तकाचे अवलोकन, वाचन, संदर्भ शोधन होत राहते. आपल्या मालकीचे पुस्तक, ते कधीही आपल्याला उपलब्ध असते, हा दिलासा मोठा सुखद असतो.


...मराठी वाचकांना आता अशा ग्रंथप्रदर्शनांना भेट देण्याची आणि वेगवेगळ्या विषयांवरची शेकडो हजारो-पुस्तके डोळे भरून बघण्याची सवय होऊ लागली आहे. मोठ्या प्रशस्त सोयीच्या सभागृहात वा दालनात विषय-लेखक-प्रकाशक वगैरेंच्या अनुरोधाने आकर्षकरीत्या मांडलेली पुस्तके बघताना, हाताळताना, आनंद-उत्सुकता वाटते. मराठीत इतकी पुस्तके, इतक्या विषयांवरची पुस्तके निघतात हेही अनेक वाचक-ग्राहकांना पहिल्यांदाच जाणवते आणि मराठी भाषेच्या ग्रंथिक, वैचारिक, कलात्मक समृद्धीचे नवेच दर्शन घडते. इतर अनेक भारतीय भाषांच्या तुलनेत मराठी पुस्तकांची निर्मिती मूल्ये अधिक नेटकी व देखणी असतात. उत्तम मुखपृष्ठे करणारे अनेक प्रयोगशील प्रतिभाशाली कलावंत येथे आहेत. उत्तम मुद्रण करणारे छापखाने आहेत. निर्मितीच्या विविध अंगांकडे साक्षेपाने लक्ष पुरवणारे प्रकाशक आहेत. कथाकादंबऱ्यांबरोबर चरित्रे, नाटके, प्रवासवर्णने, ललित लेख, काव्य, बालवाङ्मय, समीक्षा वगैरे प्रकारच्या पुस्तकांचीही विपुल संख्या टेबलामागून टेबलावर आपले लक्ष वेधून घेण्यास उत्सुक असते. अध्यात्मिक, धार्मिक पोथ्या, पाकशास्त्रावरील पुस्तके, विज्ञानविषयक पुस्तके, ज्योतिषावरची पुस्तके, व्यक्तिमत्त्वविकास आणि व्यवस्थापनावरील पुस्तके, परदेशी पुस्तकांचे - बेस्टसेलर्सचे अनुवाद, इंग्रजी-मराठी शब्दकोश, संदर्भग्रंथ, छंदविषयक माहिती देणारी पुस्तके, ज्ञानकोशात्मक ग्रंथ, व्यंगचित्रांचे संग्रह, विनोदांचे संग्रह, संगणक-माहिती तंत्रज्ञानावरील पुस्तके, अंकलिप्यांपासून ते पदव्युत्तर अभ्यासक्रमाची पुस्तके, आकर्षक छायाचित्रांची टेबलबुक्स, शेती-बागायतीवरील पुस्तके, ...विविध विषयांवरची ही हजारो पुस्तके बघताना डोळ्यांचे पारणे फिटते. आपल्या मायमराठीचे हे सगळे भरजरी अलंकार बघताना एक आगळीच धन्यता लाभते. त्या अलंकारांची जडणघडण करणाऱ्या प्रतिभाशाली कलाकारांबद्दल आदरभावही मनीमानसी दाटून येतो.

वर्षाकाठी कोट्यवधी रुपयांची उलढाल करणारे हे क्षेत्र - दहा कोटी लोकसंख्येद्वारे जगातील पहिल्या दहा भाषांमध्ये गणले जाणारे आपले संख्याबळ - हजारबाराशे वर्षांची अखंड वाङ्मयीन परंपरा असणारे हे विराट ग्रंथविश्व - त्याबद्दलचा अभिमानही वाटतो. नॅशनल बुक ट्रस्टचा अनुभव असा की त्यांच्या २२ भाषांतून निघणाऱ्या पुस्तकांपैकी फक्त इंग्रजी, मराठी, कानडी, बंगाली आणि तमिळ पुस्तकांचाच काय तो चांगला खप होतो. इतर काही भाषांतील पुस्तकांच्या तर पाचपन्नास प्रतीही खपत नाहीत. त्या वर्षानुवर्षे गोडाऊनमध्ये धूळ खात पडलेल्या असतात. पंजाबी, काश्मिरी, कोकणी, सिंधी भाषांमध्ये म्हणे पुस्तक विकत घेण्याची लोकांना सवयच नाही. त्यामानाने आपण मराठी माणसे खरोखरच कर्तबगार आहोत. आपल्याकडे शंभरावर वर्षे कार्यरत असणाऱ्या प्रकाशनसंस्थाही आहेत, तसेच वर्षाला शंभरावर पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशनसंस्थाही आहेत;

आणि वर्षाकाठी काही कोटींचा ग्रंथव्यवहार करणारे विक्रेतेही आहेत. अर्थात अजूनही ग्रंथव्यवहारात वाढ होण्याला अवसर आहे आणि पुस्तकांचा खप अधिक होण्याची गरज आहेच.

या सगळ्या अभिमानास्पद ग्रंथव्यवहाराला पोषक असे उपक्रमही मोठ्या प्रमाणावर होत असतात. साहित्यसंमेलने, ग्रंथजत्रा, ग्रंथप्रदर्शने, पुरस्कार, परिसंवाद, व्याख्यानमाला वगैरे...वाङ्मयीन आणि सांस्कृतिक वातावरण ताजे तरतरीत ठेवण्यास उपयुक्त ठरत असतात. नव्यानेच साहित्यक्षेत्रात आपले स्थान भरभक्कम करून आपला आवाज दूरपर्यंत पोहोचवण्यासाठी उत्सुक असलेल्या दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्य चळवळींनीही मराठी साहित्यक्षेत्रात आणि ग्रंथव्यवहारात मोलाची भर टाकली आहे. मराठीच्या वैभवाची पताका दूरवर नेण्यासाठी आपले सरकार आणखी संवेदनाक्षम व्हायला हवे, हेही येथे नमूद करायला हवे. खडूफळा योजना, सर्व शिक्षा अभियान, विज्ञानसाहित्य वगैरे योजनांबाबत अधिक उत्साही व तत्पर आखणी व्हायला हवी. ग्रंथालये आणि शाळा महाविद्यालये यांची अनुदाने वेळेत द्यायला हवीत. वगैरे.

ग्रंथप्रदर्शने भरवून गावोगावच्या रसिकांना हजारो पुस्तके बघण्याची संधी देणाऱ्या संस्थांनाही सरकारने व संज्ञापनमाध्यमांनी अधिक आत्मीयतेने सहकार्य द्यायला हवे. पुस्तकांच्या जाहिराती करणे सध्या परवडत नाही. वृत्तपत्रांचे जाहिरातींचे दर पुस्तकांच्या व्यवहाराला न झेपणारे असतात. ई टीव्ही, अल्फा, सह्याद्री वगैरे वाहिन्यांनी दर आठवड्याला नव्या जुन्या पुस्तकांवर प्रकाश टाकणारे कार्यक्रम ठेवले पाहिजेत. ग्रंथप्रदर्शनांसाठी जागा देताना संबंधित संस्थानीही नेहमीचे कमर्शियल दर दूर ठेवून सवलत देणे जरूर आहे. काही महापालिका पुस्तकांवर व मासिकांवरही जकात आकारतात. ज्ञानावर ही जकात आहे; ती अयोग्य आहे. पुस्तकांवरची जकात रद्द करायला हवी. ग्रंथव्यवहाराला पोषक वातावरण हवे. मराठीतील ग्रंथव्यवहार हा यापुढच्या काळातही फुलत फोफावत राहणार आहे. पण त्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य हवे. ग्रंथप्रदर्शनांच्या बाबतीत ढवळे ग्रंथ यात्रेने खूप धडाकेबाज प्रयोग केले. रघुवीर ढवळे यांनी त्यासाठी खूप परिश्रम घेतले. दुर्दैवाने काही चुकीचे निर्णय अंगाशी आले आणि ते अडचणीत आले. परंतु, सात वर्षांच्या काळात त्यांनी दीडशेवर ग्रंथप्रदर्शने भरवून लाखो रुपयांची पुस्तके विकली. वाचकांना पुस्तके बघण्याची सवय लावली... ढवळे ग्रंथयात्रेच्या तालमीत तयार झालेल्या रमेश राठिवडेकर प्रभृतींनी 'अक्षरधारा'तर्फे ग्रंथप्रदर्शनांचे काम पुढे चालू ठेवले. दहा वर्षांत दोनशे ग्रंथप्रदर्शनांची मजल गाठली. दोन मोबाईल व्हॅन्सद्वारेही लहानसहान गावी पुस्तके नेण्याची व्यवस्था केली. अन्य काही संस्थाही ग्रंथप्रदर्शने भरवत आहेत. या सर्वांनीच नेटका व्यवहार करून विश्वास संपादन करायला हवा. ग्रंथप्रदर्शने भरवणाऱ्या काही व्यक्तींच्या आर्थिक व्यवहाराबाबत प्रकाशकांच्या तक्रारी आहेत, हे येथे नमूद करायला हवे. ग्रंथव्यवहार वाढत आहे, वाढायला हवा. त्याचा पाया भक्कम व विश्वासार्ह हवा. त्यातच सर्वांचा फायदा आहे.





## साहित्यवार्ता

### * 'श्रीमान योगी' कादंबरीचे अडोळी येथे वाचन

अधिक मासाचे औचित्य साधून ग्राम अडोळी येथे रणजित देसाई लिखित 'श्रीमान योगी' या कादंबरीच्या जाहीर वाचनाचा आगळावेगळा उपक्रम केला गेला. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला. हिंदू संस्कृतीत अधिक मासाचे महत्त्व असल्याने या काळात गावोगावी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मात्र, अडोळीवासीयांनी या जुन्या चालीरीतीस फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावरील रणजित देसाई लिखित 'श्रीमान योगी' या कादंबरीच्या वाचनाचा उपक्रम हाती घेतला. शिवचरित्राचे वाचन सेवानिवृत्त मुख्याध्यापक जिजाबा इढोळे यांनी केले. हरिभाऊ गोटे,प्रकाश महाराज तथा अभिमान महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आत्माराम, भागवत, देविदास, रामदास, उद्धव, विठ्ठल, संतोष,दत्ता इढोळे,बालाजी शिंदे,गजानन वाकोडे, आदी युवकांनी या उपक्रमात पुढाकार घेतला.

### * जैन जीवनशैलीचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून घडावे

महाराष्ट्र आणि मराठी समाजाशी जैन समाज एकरूप झालेला आहे. त्यांचा बराचसा व्यवहारही मराठीतून चालतो तरीही मराठी साहित्यात जैन तत्त्वज्ञान, जैन जीवनशैलीचे फारसे प्रतिबिंब उमटलेले नाही याविषयी खंत व्यक्त करतानाच जैन साहित्यिकांबरोबरच इतर साहित्यिकांनीही आपल्या साहित्यातून जैन जीवनशैलीचे विधायक प्रतिबिंब मांडावे, अशी अपेक्षा जैन साहित्य संमेलनात व्यक्त केली गेली.

प. पू. मधुस्मिताजी म. सा. यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातर्फे जैन साहित्यिकांचे संमेलन रविवार कारंजावरील जैन श्रावक संघात करण्यात आले होते.

'जोहड' ही कादंबरी लिहिणाऱ्या सोलापूर येथील सुरेखा शहा म्हणाल्या की, जैन तत्त्वज्ञान आत्म्याचा विकास साधणारे आहे. जैन आचार, विचार, जैनांची जीवन पद्धती ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानवी जीवनाचे सार या तत्त्वज्ञानात सांगितले आहे. हे तत्त्वज्ञान मराठी साहित्यात आणतानाच जैनांच्या समस्या, समाजातील प्रश्न यांचेही डोळस दर्शन साहित्यातून घडविले पाहिजे.

डोंबिवली येथील साहित्यिक व या चळवळीचे प्रणेते श्रेणिक अन्नदाते म्हणाले की, मराठी साहित्यातून जैन जीवनशैलीचे, विचारांचे प्रतिबिंब पुढे येत आहे. जैन तत्त्वज्ञान हृदयात जपून ठेवण्याचे काम समकालीन मराठी जैन साहित्याने केले आहे. मात्र अधिकाधिक

साहित्यिकांनी पुढे येऊन हा विचार अधोरेखित केला पाहिजे.

कारंजा येथील नीता मिश्रीकोटकर यांनी घेतला. जैन कथांचा आढावा घेताना विविध कलाकृतींचे विवेचन केले. मीना गरिबे यांनी जैन श्वेतांबरी जीवनशैलीचेच चित्रण मराठी साहित्यातून झाले असल्याचे स्पष्ट करून मराठी साहित्यातील जैन तत्त्वज्ञानाचा आढावा घेतला.

प. पू. मधुस्मिताजी यांनी जैन समाजातील सर्व प्रवाहांचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून उमटावे, जैन समाजाची, तत्त्वज्ञानाची विशालता, उदात्तता घराघरात पोहोचावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

## * कृषिज्ञानकोश खंड तिसरा प्रकाशन

शेतीमालावरील प्रक्रिया उद्योगावर भर देण्याचा व्यापक प्रयत्न झाल्यास देशाच्या आर्थिक विकासात आठ ते दहा टक्क्यांनी वाढ होईल, असे प्रतिपादन अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले.

'हरित क्रांतीद्वारे देशाने अन्नधान्यातील स्वयंपूर्णता प्राप्त केली असली, तरी तेलबिया आदींबाबत स्वयंपूर्णता नाही. भावी काळातील लोकसंख्येचा विचार करून अन्न सुरक्षा प्राप्त करण्यासाठी शेतीला प्राधान्य द्यायला हवे,'' असे ते म्हणाले.

सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत शेतीशी संबंधित सर्व माहिती देण्यासाठी कृषिज्ञानकोशाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सुमारे पंधरा खंडांचा हा प्रकल्प असून, त्यांपैकी तिसरा खंड आता सज्ज झाला आहे. या उपक्रमाचे सर्वच वक्त्यांनी कौतुक केले.

डॉ. काकोडकर म्हणाले, ''हे काम अवघड; पण गरजेचे आहे. शेतीबाबत अधिकाधिक जागरूकता आणण्याची गरज आहे. हरित क्रांतीमुळे गहू आदी धान्यांचे उत्पादन आपण वाढवू शकलो; परंतु आता पुढील काळाचा विचार केला पाहिजे. लोकसंख्या अद्याप स्थिरावलेली नाही. अशा स्थितीत उपलब्ध साधनसंपत्ती व शेतजमिनीद्वारे अधिक धान्य पिकवायचे आहे. त्यावर प्रक्रियाही करायची आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना समजेल अशा भाषेतून ज्ञान मिळणे आवश्यक आहे. कृषिज्ञानकोश हा प्रकल्प म्हणूनच महत्त्वाचा ठरतो.''

श्री. अशोक जोशी म्हणाले,''पारिभाषिक शब्दही आपण घेतले पाहिजेत. त्यासाठी भाषाशास्त्रज्ञांची मदत घेतली जावी. असा प्रयत्न झाला तरच आपली भाषा ज्ञानभाषा होते.''

डॉ. महाजन यांनी तिसऱ्या खंडाची माहिती दिली. या खंडाचा अलका जोशी आणि सुनीती हळबे अनुक्रमे गुजराती आणि हिंदी भाषेत अनुवाद करीत आहेत. त्यांचा आणि डॉ. सुधांशू गोरे यांचा सत्कार करण्यात आला. मुंबईच्या श्यामलाताई गोखले यांनी या प्रकल्पास एक लाख रुपयांची देणगी दिली.

## * अटलांटात मराठीचा फडकतोय झेंडा!

अमेरिकेत अटलांटामध्ये होणाऱ्या महाराष्ट्र मंडळाच्या १२ व्या द्विवार्षिक अधिवेशनात प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट, क्रिकेटपटू सुनिल गावस्कर आणि सिनेतारका उर्मिला मातोंडकर या विज्ञान, साहित्य, क्रीडा आणि कला क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार होणार आहे.



अटलांटा येथे सुमारे तीनशे मराठी कुटुंबे राहात असून त्यातील ५० टक्के पुण्या-मुंबईतील आहेत. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी २० उपसमित्या काम करत आहेत. या परिषदेस किमान तीन हजार प्रेक्षक येण्याची शक्यता असल्यामुळे 'रिस्क मॅनेजमेंट' हा स्वतंत्र विभाग काढण्यात आला आहे.

या उपसमित्यांमध्ये आदिती जोगळेकर ही १३ वर्षांची सर्वात लहान मुलगी असून तिच्याकडे या कार्यक्रमातील बेबी सिटिंग आणि सिनियर सिटिझन विभागाचे उपाध्यक्षपद सोपवले आहे! अटलांटामध्ये जॉर्जिया टेक्नोलॉजी युनिव्हर्सिटीमध्ये शिकणारे ५० विद्यार्थी या नियोजनाच्या कामात आपणहून पुढे आले आहेत.

## * अक्षरधारा - २०० वे ग्रंथप्रदर्शन

तरुण पिढीचे वाचन सर्वस्वी बंद झाले आहे, असे समजणे चुकीचे असून त्यांच्या आवडीनिवडींनुसार, त्यांच्याशी संबंधित, त्यांना रुचेल अशा भाषेतील लिखाण करण्यात सध्याचा लेखकच कमी पडतोय, अशी खंत नियोजित साहित्य संमेलनाध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी व्यक्त केली.

अक्षरधाराच्या दशकपूर्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'पुणे ग्रंथोत्सवा'चे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले ते बोलत होते. ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, मांडके हिअरिंग सर्व्हिसेसच्या कल्याणी मांडके, अक्षरधाराचे संचालक रमेश राठिवडेकर आणि नगरसेवक विलास वाडेकर यावेळी उपस्थित होते.

तरुणांच्या वाचनावर सध्या देशाचे भविष्य ठरते. विविध विषयांचा आविष्कार करून युवकांना गुंतवून ठेवणाऱ्या लिखाणाची गरज असल्याने सध्याच्या लेखकांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

अनेक घरांत सध्या पुस्तकांनी भरलेली कपाटे दिसतात; पण त्याचा उपयोग केवळ इंटिरीयर शो पीस म्हणून होतो. त्याचा उपयोग माणसांपर्यंत पोहोचण्यास झाला तर विचारशक्तीला मिळणारी चालना सत्कारणी लागेल, असे मत व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी व्यक्त केले.

## * अर्थशास्त्रीय पुस्तकांचा विक्रम

कोल्हापूर येथील अर्थशास्त्राचे प्राध्यापक के. एन. ठक्कर यांनी अर्थशास्त्र विषयावर १२५ पुस्तके लिहून एक नवा जागतिक विक्रम केला आहे. अकरावीपासून बीए, बीकॉम, एम कॉम, एम ए पर्यंतच्या अभ्यासक्रमातील ही पुस्तके असून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी या पुस्तकांना मान्यता दिली आहे. परिमल शहा आणि प्रा. बी. एच. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रा. ठक्कर यांच्या दोन नव्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. पुढील काही महिन्यात त्यांची १७ पुस्तके बाजारात येतील अशी माहिती मेहता बुकसेलर्सच्या अनिल मेहतांनी दिली. गिनीज बुकमध्ये या विक्रमाची नोंद करण्याचा आमचा प्रयत्न आहे असेही त्यांनी सांगितले. प्रा. ठक्कर यांचा गौरव करण्यासाठी कोल्हापूरात सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार आहे.

## * दहा संमेलनाध्यक्ष एका व्यासपीठावर

पुणे मराठी ग्रंथालयाचे कार्यवाह मुकुंद अनगळ यांनी लिहिलेल्या 'चिंतन सार्वजनिक

ग्रंथालयांचे' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी नाशिक येथे होणाऱ्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम, मावळते संमेलनाध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव आणि के. ज. पुरोहित, डॉ. यू. म. पठाण, मधू मंगेश कर्णिक, नाराण सुर्वे, द. मा. मिरासदार, विजया राजाध्यक्ष, राजेंद्र बनहट्टी, सुभाष भेंडे हे माजी संमेलनाध्यक्ष आणि साहित्य-संस्कृती महामंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. रा. रं. बोऱ्हाडे हे सर्व उपस्थित होते.

यावेळी बहुतेक सर्वांनी वाचन संस्कृतीवर प्रकाश टाकला. लोकं सांगतात म्हणून वाचन करण्यापेक्षा मनाला कार्यक्षम ठेवण्यासाठी वाचत राहिले पाहिजे, असे मेश्राम यांनी सांगितले. वाचनाचे वेड लागून नवीन वाचन संस्कृती निर्माण व्हावी, अशी आशा मिरासदार यांनी व्यक्त केली. नारायण सुर्वे यांनी टीव्हीला कंटाळलेले नवीन वाचक तयार होत असल्याचे सांगून वाचकांच्या वाचनाचा कानोसा घेण्याची गरज प्रतिपादन केली.

प्रा. रा. ग. जाधव यांनी अनगळांचे पुस्तक ग्रंथालय चळवळीत आलेल्या अनुभवांवर आधारित असले तरी ते त्रोटक असल्याचे नमूद केले. या चळवळीतील समस्या, भविष्यातील वाटचाल यांचा चिकित्सक अभ्यास होण्याची आवश्यकता त्यांनी बोलून दाखवली, भेंडे यांनी साहित्य आणि साहित्यिक यांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त केली.

### * दिवाळी अंकांचे स्वरूप कालानुरूप बदलण्याची गरज

दिवाळी अंकांच्या पारंपरिक स्वरूपामध्ये कालानुरूप बदल करण्याची आवश्यकता ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केली.

'साहित्य शिवार'च्या रौप्यमहोत्सवी दिवाळी अंकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. सिंबायोसिसचे प्रमुख डॉ. शां. ब. मुजुमदार, माजी महापौर अंकुश काकडे, शांतीलाल सुरतवाला, आदी यावेळी उपस्थित होते.

आज दिवाळी अंक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. बाजारपेठ मिळवण्यासाठी व्यापारी तत्त्वावर अंक काढायला हवेत. नवीन प्रयोगशील विचार त्यात यायला हवेत. सध्या वर्तमानपत्रांच्या पुरवण्यांमधून सर्व विषयांना स्थान मिळत असल्याने काहीतरी वेगळे देऊन वैशिष्ट्य मिळवण्याचा प्रयत्न करायला करावा. मराठी माणूस गुणग्राहक असल्याने चांगला दिवाळी अंक महाग असला तरी तो विकत घेतला जाईल, अशी आशाही जाधव यांनी व्यक्त केली. हातोटी, कसोटी आणि सचोटी राखल्यास कोणताही उपक्रम यशस्वी होऊ शकतो, असे प्रा. मुजुमदार यांनी सांगितले. 'साहित्य शिवार'चे संपादक जयराम देसाई यांनी प्रास्ताविक केले.

### * 'गुगल' पुस्तकांची पाने 'ऑनलाइन'

'गुगल' या महाकाय इंटरनेट सर्च कंपनीने आता आपल्या वापरकर्त्यांना विशिष्ट नामांकित पुस्तकांची पाने 'ऑनलाइन'शोधण्याची सोय व सेवा उपलब्ध करून दिली आहे. 'इंटरनेट सर्च जायंट'म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'गुगल'ने याद्वारे 'ऑनलाइन रिटेलर' असलेल्या, अशाच प्रकारच्या तंत्रज्ञानाद्वारे 'ई कॉमर्स साइट' चालविणाऱ्या 'ॲमेझॉन डॉट कॉम'ला आव्हान देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. याआधीच 'ॲमेझॉन.कॉम'ने 'ए नाइन' या नावाने प्रतिस्पर्धी 'सर्च इंजिन' आपल्या साइटवरून सुरू करून 'गुगल'च्या 'साम्राज्या'वर



चढाईला प्रारंभ केला आहे.

'ऑडियन्स'च्या संख्येचा विचार करता 'गुगल'च्या 'व्हिजिटर्स'ची संख्या बरीच मोठी आहे. 'नेल्सन/नेटरेटिंग्ज' या मेझरमेंट फर्मने केलेल्या पाहणीनुसार 'गुगल'ला भेट देणाऱ्यांची संख्या गेल्या ऑगस्टमध्ये ६ कोटी ३० लाख होती, तर 'ॲमेझॉन.कॉम'चे व्हिजिटर्स होते फक्त ३ कोटी ११ लाख! 'गुगल'च्या प्रॉडक्ट मॅनेजमेंट डायरेक्टर सुसान वोज्सिकी म्हणतात: समग्र जगाची माहिती मिळवणे, संग्रहित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे आणि पुस्तके सूचीमध्ये आणणे हा आमचा उत्क्रांतीचाच एक नैसर्गिक भाग आहे.

'गुगल'ने प्रकाशकांसाठी 'प्रिंट डॉट गुगल डॉट कॉम' ही संवाही विनाशुल्क उपलब्ध केली आहे, हे विशेष! प्रकाशक आपली पुस्तके 'गुगल'च्या कॅलिफोर्नियातील कार्यालयाला पाठवू शकतात व 'गुगल'चे कर्मचारी अशा पुस्तकांची पाने चाळून ती इंडेक्समध्ये समाविष्ट करू शकतात.

न्यूयॉर्क येथील सर्च मार्केटिंग फर्म 'टेन ईट्वेंटी'चे प्रसिडेंट ख्रिस विनफील्ड म्हणतात: 'गुगल विरुद्ध याहू ही स्पर्धा आता बदलून 'गुगल'विरुद्ध ॲमेझॉन अशी सुरू झाली आहे. ही स्पर्धा पाहणे मनोरंजक ठरणार आहे. आमच्या कंपनीची जाहिरात गुगलच्या 'बुक पेजेस'वर पाहून मला आनंद वाटला होता. पण 'गुगल'च्या ब्राउझरवर आमची जाहिरात पहायला मला अधिक आनंद वाटेल.

प्रतिस्पर्धी 'मायक्रोसॉफ्ट'च्या स्पर्धेत 'गुगल' उतरणार असून, स्वत:चे इंटरनेट ब्राउझर सुरू करणार आहे. त्यात 'सर्च', 'ई मेल' आणि 'फोटो मॅनेजमेंट टूल्स' यांचा समावेश असेल, अशाही बातम्या पसरल्या होत्या. मात्र 'गुगल'चे प्रवक्ते नाथन टायलर यांनी हे केवळ अंदाज (स्पेक्युलेशन) असल्याचा खुलासा केला आहे. 'गुगल'ला ॲमेझॉनशी स्पर्धा करण्यासाठी अजून बराच दूरचा पल्ला गाठायचा आहे. सध्या 'गुगल'वर मूठभरच पुस्तके 'ऑनलाइन'आहेत, तर ॲमेझॉनच्या साइटवर एक लाखांहून अधिक पुस्तके 'ऑनलाईन' उपलब्ध आहेत. 'गुगल'ने सुरू केलेल्या 'बुक्स ऑनलाइन' सेवेवर ॲमेझॉनने कसलीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही.

### * बोलण्यावागण्यातील विनोद शोधला पाहिजे: सप्रे

जीवनात जागोजागी विनोद आहे. बोलण्यात, चालण्यात, वागण्यात दिसणारा विनोद शोधता आला पाहिजे. विनोदाची बीजे टिपण्याचे सामर्थ्य तुमच्यात पाहिजे, असे मत ज्येष्ठ व्यंगचित्रकार मनोहर सप्रे यांनी सातारा येथे व्यक्त केले. वनराई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने त्यांचे 'व्यंग विनोद' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

विदूषक कधीही हसत नसतो. तो दुसऱ्याला हसवतो. जीवनातील ही सर्वात महत्त्वाची विसंगती आहे. अशा विसंगती दाखविण्याचा प्रयत्न व्यंगचित्रांतून होतो, वस्तुस्थितीची हास्यकारक रचना म्हणजेच व्यंगचित्र, अशी व्याख्या करून सप्रे म्हणाले, ''संदर्भ बदलतात, अर्थ बदलतात. त्याच पद्धतीने व्यंगचित्रकारही बदलत्या परिस्थितीचे निरीक्षण मांडतात. निर्मितीची क्षमता हा व्यंगचित्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जगदीश पाटील आणि ट्रस्टचे अध्यक्ष रवींद्र झुटिंग यांनी विविध उपक्रमाची माहिती दिली.

## * विविध भाषांतील पुस्तकांची 'पुणे बुक फेअर'

'पुणे बुक फेअर'चे आयोजन २४ ते २८ नोव्हेंबर रोजी न्यू इंग्लिश स्कूल मैदान टिळक रोड येथे करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन चित्रपट अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते झाले. पुणे पुस्तक विक्रेता संघ, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, डिस्ट्रिब्युटर्स आणि पब्लिशर्स असोसिएशन, बंगाली संसद, पुणे गोवा इन्स्टिट्यूट, आंध्र असोसिएशन आणि कन्नड संघ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनात देशातील १५० हून अधिक पुस्तक विक्रेते, वितरक व प्रकाशन संस्था, शैक्षणिक संस्था आदींनी भाग घेतला आहे. अंधांसाठी ब्रेल लिपीतील पुस्तके समाविष्ट केली होती.

प्रदर्शनात माहिती तंत्रज्ञान, आरोग्य, व्यवस्थापन, व्यापार, कायदा, धार्मिक, राजकारण आदी विषयांवरील पुस्तके आणि विविध भाषांतील वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिकेही ठेवण्यात आली होती. पुस्तक प्रकाशन समस्या व योजना, युवकांसाठी व्यवसाय व शिक्षण क्षेत्रातील संधी, स्त्री साहित्य, बालसाहित्य, गोवा व फ्रेंच फेस्टिवल आदी कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. छोटे प्रकाशक व पुस्तक विक्रेते यांना सामूहिक तत्त्वावर एकत्र आणून कमी शुल्काने स्वतंत्र विभागाची सोय करण्यात आली होती.

## * साहित्याचा अमूल्य ठेवा जपण्यासाठी भाषांतरकाराचे महत्त्व

म. गांधी, रवींद्रनाथ टागोर, चेखव, दस्तयेवस्की यांसारख्या विचारवंतांचे साहित्य भाषांतर करणाऱ्यांमुळे भाषेच्या सीमा ओलांडून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. त्यामुळे जागतिक साहित्याचा अमूल्य ठेवा जपण्यासाठी भाषांतरकाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे मत कल्चरल सेंटर ऑफ रशियाचे आंद्रे नझरकीन यांनी व्यक्त केले.

कॉन्टिनेटल प्रकाशनचे संस्थापक अनंतराव कुलकर्णी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आणि रशियन लेखक अन्तोन चेखव यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त कॉन्टिनेटल प्रकाशनने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

नझरकीन पुढे म्हणाले की, लघुकथा व नाटक यांना मानाचे स्थान मिळवून देणारा चेखव हा लेखक सर्वसामान्यांनाही आपला वाटतो. या प्रकाशनाने रशियन साहित्याची दखल घेणे हाच चेखवचा खरा सत्कार असून ही कौतुकास्पद व अभिमानाची बाब आहे.

सुमती कानिटकर यांनी मराठी अनुवाद केलेल्या 'चेखवच्या आठ दीर्घकथा' या पुस्तकावर प्रा. चेतन ठकार यांनी, तर 'भूमिगतांची टिपणे' या डॉ. अनिल आंबीकर यांनी अनुवाद केलेल्या पुस्तकावर प्रा. विश्राम गुप्ते यांनी आपली मते व्यक्त केली.

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशने चेखवच्या कथांवर आधारित 'मनोमिलन'ही एकांकिका सादर केली.

## * रूपवेध प्रतिष्ठान

आपला मुलगा तन्वीर याच्या स्मृतिप्रीत्यर्थ तन्वीर पुरस्कार देण्याचा निर्णय डॉ. लागू आणि कुटुंबीयांनी घेतला असून त्यासाठी रूपवेध प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. तन्वीर पुरस्कार म्हणजे कृतज्ञतेचा सोहळा असेल. दरवर्षी ९ डिसेंबरला तो साजरा करण्यात येईल. अखिल भारतीय स्तरावर नाटकांसाठी महान काम करणाऱ्या रंगकर्मीस एक लाख रुपयांचा कृतज्ञता निधी देण्यात येणार आहे.



या प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी डॉ. लागू असून विश्वस्त मंडळामध्ये लागू कुटुंबीयांचे सदस्य, डॉ. महेश एलकुंचवार, डॉ. सतीश आळेकर, अतुल पेठे आणि श्री. मुकादम यांचा समावेश आहे.

## * सर्वांना मोफत पुस्तके देण्याच्या निर्णयापासून सरकारचे घुमजाव

विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वी राज्यातील १० वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याचे मधाळ बोट मतदारांपुढे धरणाऱ्या लोकशाही आघाडी सरकारने आता या निर्णयापासून सपशेल घुमजाव केले आहे.

सरसकट मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्याचा निर्णय केवळ वर्षभरापुरता होता. यापुढे राज्यातील गरजू विद्यार्थ्यांनाच मोफत पुस्तके दिली जातील, असे शालेय शिक्षण मंत्री वसंत पुरके यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. पुरके म्हणाले की, सर्व शिक्षा अभियानात मोफत पाठ्यपुस्तके देण्याकरिता ७५ टक्के रक्कम केंद्र सरकार देते व उर्वरित २५ टक्के रक्कम राज्य शासन खर्च करते. या योजनेचे लाभार्थी असलेल्यां गरजू विद्यार्थ्यांनाच मोफत पाठ्यपुस्तके दिली जातील. अन्य कोणत्याही राज्यात नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जात नाहीत, असे ते म्हणाले.

चालू शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पडण्यात झालेला विलंब पुढील शैक्षणिक वर्षात होणार नाही, असे सांगून पुरके यांनी गतवर्षी निविदा पद्धती बदलल्यामुळे शासनाचे १५ कोटी रुपये वाचल्याचा दावा केला. पाठ्यपुस्तकांची छपाई स्थानिक छोट्या मुद्रकांना न देता परराज्यातील बड्या मुद्रकांना देण्याचे नवीन धोरण यावर्षीही कायम असल्याचे त्यांनी सांगितले.

## * 'शब्दांची समृद्धी हीच शिक्षकांची खरी दिवाळी'

शिक्षकांनी शब्दांनी समृद्ध असायला हवे, कारण शिक्षकांची खरी दिवाळी ही शब्दांची दिवाळी असते, असे मत लेखिका डॉ. इंदुमती अरकडी यांनी व्यक्त केले.

त्यांच्या आत्मचरित्राचा प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. शरद वाघ, तर अध्यक्ष म्हणून डॉ. लीला दीक्षित उपस्थित होत्या.

विद्यार्थी हाच शिक्षकाचा देव व शाळा किंवा महाविद्यालय हे त्यांचे मंदिर, तर अध्यापन ही त्याची पूजा असे डॉ. अरकडी यांनी सांगितले. जिद्दीने, चिवट व जिगरपणे जगलेल्या जीवनाचे दर्शन या आत्मचरित्रात घडते असे डॉ. लीला दीक्षित यांनी सांगितले.

## * चिनी-आंग्ल भाषेत पहिले पुस्तक

सन वू या चिनी लेखकाचे 'युद्धकला' हे पुस्तक सध्या चीनमध्ये गाजत आहे. त्याला कारणही तसेच आहे. हे पुस्तक द्वैभाषिक असून, चिनी आणि इंग्रजी अशा दोन टोकांच्या भाषा यात आहेत. कुतुहलाचा आणि कौतुकाचा विषय असलेल्या चिनी युद्धकलेचे रहस्य या पुस्तकात विशद करण्यात आले आहे. युद्धक्षेत्रातील तज्ज्ञांचे ते आकर्षण ठरत आहे.

या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची पाने ९९.९९ टक्के शुद्ध सोन्याची आहेत. त्यामुळे पुस्तकाची एक प्रत दहा हजार वर्षे जशीच्या तशी टिकणार आहे. अशा केवळ पाच हजार प्रती देशात आणि परदेशात मिळून विकल्या जातील, अशी माहिती यासंदर्भात देण्यात आली आहे.

### * 'सामाजिक, सांस्कृतिक दहशतवाद'

केवळ साक्षरतेचे प्रमाण वाढल्याने शिक्षणक्षेत्रात क्रांती होणार नसून, त्यासाठी भाषिक, सांस्कृतिक व सामाजिक दहशतवाद रोखणे गरजेचे आहे, असे मत हरी नरके यांनी केले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या आकुर्डी येथील रामकृष्ण मोरे महाविद्यालयात 'महाराष्ट्रातील शिक्षण - दशा व दिशा' या विषयावर बोलताना व्यक्त केले.

नरके म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले व त्यांच्या कार्यात हातभार लावणारे रानबा महार, लहुजी वस्ताद साळवे, फातिमा शेख, उस्मान शेख हे बहुजनांच्या ज्ञानसत्तेचे खरे शिल्पकार आहेत.

### * रवींद्रनाथ टागोर - दुर्मिळ लघुपट

रवींद्रनाथ टागोर यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्य केले आणि आयुष्यभर मानवतावादाचा पुरस्कार केला, असे मत डॉ. मृणालिनी गडकरी यांनी व्यक्त केले.

'सृष्टी' या संस्थेच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त जगप्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित रे यांनी तयार केलेला 'रवींद्रनाथ टागोर' हा दुर्मिळ लघुपट दाखविण्यात आला. गेली १२ वर्षे दरमहा एक याप्रमाणे १३५ हून अधिक कार्यक्रमांचे आयोजन 'सृष्टी'ने केलेले आहे. अंधजनासाठी कार्य करणाऱ्या ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान अनाथ बालकांसाठी कार्यरत असणाऱ्या सन्मती बालनिकेतन या संस्थांना त्यांचे सहकार्य लाभले आहे. संस्थेचे मानद अध्यक्ष उस्ताद उस्मान खान यांनी समारोप केला.

### * भाषेचे बंध तोडून 'ग्रामगीता' आता सातासमुद्रापलीकडे

माध्यमिक शाळेत इंग्रजी विषय शिकविणाऱ्या एका शिक्षकाने, ग्रामोन्नतीची उपासना करण्याचा उपदेश करणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 'ग्रामगीते'चा इंग्रजी अनुवाद केला आहे.

विनायक विश्वनाथ कुलकर्णी यांना अमरावती शहर ओळखते, ते 'व्हीव्ही' म्हणूनच. इंग्रजीची 'फाडफाड' पिढी त्यांनी घडवली. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत व गणित हे त्यांचे विषय. अमरावतीच्या न्यू हायस्कूल बेलपुरा या शाळेतून ते १९९६ मध्ये निवृत्त झाले आणि त्यानंतर त्यांनी अध्यात्म विषयाला वाहून घेतले. यातच तुकारामदादा गीताचार्य यांनी त्यांच्यावर 'ग्रामगीते'च्या इंग्रजी अनुवादाची जबाबदारी सोपवली. अनुवाद करताना शब्दांच्या अनेक अडचणी आल्या. अध्यात्मशास्त्रात वैदिक संस्कृत शब्द आहे. त्यांना सार्थ किंवा पूर्णार्थ देणारे शब्द इंग्रजीत नाहीत. त्यामुळे हजारो शब्दांचे स्पष्टीकरण, त्यासाठी तळटीपा, शिवाय अनेक ठिकाणी कंसात शब्दांचे दीर्घरूपही दिले आहे. अरविंद घोष, जे. सी. घोष, विवेकानंदांची व्याख्याने, विविध अध्यात्म शब्दकोश आदींचे साह्य झाले, असे श्री. कुलकर्णी म्हणाले.

### * पुस्तकांनी आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी दिली

''पुस्तकांचे जग असते मनाला हसत खेळत ठेवणारे, सद्भावना निर्माण करणारे, गदगदा हलवून जागे करणारे. आपणाला अधिक चांगला माणूस व्हायला साहित्य शिकवते,'' असे प्रसिद्ध साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांनी सांगितले.

पॉप्युलर बुक हाउसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. अवचट, ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू व प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले यांनी 'माझ्या जडणघडणीमध्ये पुस्तकांचे महत्त्व' विशद केले. माधव व विजया गाडगीळ यांचा सत्कार, प्रख्यात विनोदकार प्राचार्य बाळ गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आला.

ज्याच्या वाचनाने आपण थोडे तरी बदलतो, ते चांगले साहित्य असते, अशी व्याख्या करीत डॉ. अवचट म्हणाले, ''कथा-कादंबरीत आपण आपल्या मनातील प्रतिमासृष्टी, अनुभव पडताळून पाहात असतो. आपले वाचन ही पुन्हा आपली निर्मितीच असते. त्यातून आपण अधिक कळत जातो. थोडे तरी बदलतो. माणसे आत्महत्या का करतात, हे 'ॲना कॅरेनिना' वाचल्यावर उमगले. प्रेमचंदांच्या 'गोदान'ने भारतीय शेतकऱ्यांचे निर्मळ मन समजले, शिवराम कारंतांच्या कादंबऱ्यांनी प्रचंड जीवनाचे दर्शन घडवले.''

'श्यामची आई'हे पुस्तक लहानपणीच वाचले आणि आपण पुस्तकांच्या नादी लागलो, असे डॉ. लागू यांनी सांगितले. नटाला धादांत खोटे बोलावे लागते. आपण नसलेली व्यक्ती आपणच आहोत, हे भासवीत बोलावे लागते. जीवनाचा साक्षात अनुभव साहित्य देते. नाटककाराला झालेला साक्षात्कार समजून घेऊन तो मांडावा लागतो. वाङ्मयीन सत्य हे रंगभूमीवरचे धादांत असत्य असते; मात्र ते प्रेक्षकांना सत्याचा अनुभव देणारे असावे लागते. हे करण्याची ताकद पुस्तकांनी दिली. पुस्तकांनी आपल्याला माणूस म्हणून समृद्ध केले, असे त्यांनी सांगितले.

विक्रम गोखले म्हणाले, ''पुस्तकांनी आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी दिली. आयुष्यात वाट्याला येणाऱ्या सुखदुःखांसंदर्भात अलिप्तता शिकवली. प्रत्येकात राजकीय विचार, सामाजिक बांधिलकी असायला हवी हे शिकवले. कष्टांची, दुःखाची किंमत सांगितली. एक नट म्हणूनही पुस्तकांनीच शहाणे केले.'' माधव गाडगीळ यांनी स्वागत केले. विजया गाडगीळ यांनी प्रास्ताविक केले.

### * लिखित शब्दांत विश्वासार्हता महत्त्वाची

बोलताना माणूस सैल बोलतो; पण जेव्हा त्याचा शब्द लिखित स्वरूपात येतो तेव्हा तो गंभीर होतो. या वेळी विश्वासार्हतेचा विचार केला जातो. त्यामुळे विश्वासार्हतेबरोबरच अभ्यास, द्रष्टेपणा, सोपेपणा, नेमकेपणा आणि विश्लेषकता हे घटक असले तर लेखकाने आपली जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडली, असे म्हणता येईल, असे प्रतिपादन साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी केले.

'सकाळ'च्या सोलापूर आवृत्तीच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त सरव्यवस्थापक विजया पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. संपादक अनंत दीक्षित आणि निवासी संपादक अरुण खोरे याप्रसंगी उपस्थित होते.

सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी सातत्याने तळमळीने बोलणारे, लिहिणारे आणि शंभर कोटींवर वार्षिक उलाढाल असणाऱ्या लक्ष्मी उद्योगसमूहाचे प्रमुख जयकुमार पाटील, कुष्ठरुग्णांवर उपचार व पुनर्वसनासाठी झटणारे डॉ. नागेश होनप यांचा सत्कार झाला.

भाषेचा अभ्यास हा जीवनाचा अभ्यास असतो, असे स्पष्ट करून प्रा. मेश्राम म्हणाले, ''लेखकाने अवतीभवतीचा, भूतकाळाचा, परिस्थितीचा, माणसांचा अभ्यास करायला हवा. संत रामदासांनी 'अभ्यासोनि प्रकटावे' असे म्हटले आहे. जुने पत्रकार, लेखक, आगरकर,

तुकडोजी आणि आंबेडकर यांच्या अभ्यस्त लेखनाने थरार निर्माण केला. आजच्या काळात अभय बंग याच्या लेखनावर किंवा मेधा पाटकर यांच्या कर्तृत्वावर डोळे झाकून विश्वास ठेवता येईल.''

*** संगणकामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढेल : वैद्य**

''शिक्षणात संगणकाचा वापर केल्यामुळे शिक्षकांच्या नोकरीवर गदा येणार नाही, तर त्यांच्यावर अधिक जबाबदारीच पडणार आहे,'' असे मत शिक्षणतज्ज्ञ पु. ग. वैद्य यांनी 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन कल्चर अँड एज्युकेशन'च्या 'महाराष्ट्र ज्ञानगंगा अभियान' प्रदर्शनाचे उद्घाटन करताना व्यक्त केले.

श्री. वैद्य म्हणाले, ''प्रत्येक शिक्षकाचा शिकविण्याचा वेग व विद्यार्थ्यांची ग्रहण करण्याची क्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे 'सीडी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविण्यास प्रारंभ केला, की विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार शिकविता येईल. विद्यार्थ्यांची शक्तिस्थाने ओळखून शिक्षकांनी या 'सीडी'ची चांगली संहिता करणे गरजेचे आहे.''

आकर्षक रंगसंगती, दृष्टी खिळविणारी चलचित्रे, उत्कृष्ट आवाजाचा मिलाफ असलेल्या शैक्षणिक 'सीडी'द्वारे ''दृक्‌श्राव्य पद्धतीच्या 'मल्टिमीडिया' तंत्राने शिकविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणात्मक दर्जात वाढ होते,'' असे प्राचार्य वसंत भट यांनी सांगितले.

*** नोकियातर्फे मराठीत मजकूर, संदेशांची सेवा**

नोकिया या हँडसेट उत्पादन क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने हिंदी भाषेत मजकूर आणि संदेश सेवा जाहीर केली. येत्या काही महिन्यांत मराठी भाषेतही ही सेवा देण्यात येणार आहे, अशी माहिती नोकियाच्या भारतीय विपणन विभागाचे प्रमुख संजय बहल यांनी दिली. मजकुराबाबतची सेवा देण्याच्या दृष्टीनेही मोठी बाजारपेठ त्यामुळे खुली होऊ शकते. येत्या काही महिन्यांत मराठीबरोबरच तामीळ, कानडी, बंगाली या भाषांमध्येही ही सेवा उपलब्ध होईल.

*** चैतन्यशील राष्ट्रासाठी जगन्नाथरावांचा आदर्श**

''भारताला चैतन्यशील राष्ट्र करण्याचा स्फुल्लिंग नव्या पिढीत आहे. तो चेतविण्यासाठी जगन्नाथराव जोशी यांच्यासारखे आदर्श तरुणांपुढे ठेवायला हवेत,'' असे प्रतिपादन डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी डॉ. अरविंद लेले लिखित व संपादित 'ध्येयसमर्पित लोकनेता जगन्नाथराव जोशी' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी केले. 'भारतीय विचार साधना'तर्फे हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.

डॉ. नवलगुंदकर म्हणाले,''भारत चैतन्यमय राष्ट्र व्हावे, हे स्वप्न साकारण्याची क्षमता नव्या पिढीत आहेत. मात्र त्यासाठी जगन्नाथराव जोशी यांच्यासारखे आदर्श हवेत. समाजाच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी माणसातील मनुष्यत्वाचा शोध घ्यायला हवा, यावर त्यांचा विश्वास होता.''

*** नाट्यक्षेत्रात नाव कमाविण्यासाठी अभिनयाची इच्छाशक्ती हवी**

'मी नाटक केल्याशिवाय जगूच शकणार नाही!' हा विचार जेव्हा तुमच्या मनात येईल, तेव्हाच तुम्ही खऱ्या अर्थाने नाट्यक्षेत्रात नाव कमवू शकाल, असे मत ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.



नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (नवी दिल्ली) आणि 'अॅकॅडमी फॉर क्रिएटिव्ह एज्युकेशन'तर्फे घेण्यात आलेल्या रंगशाळा नाट्य अभ्यासक्रमाचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

डॉ. लागू म्हणाले, ''शिकवून 'नट' तयार होत नाहीत, ही पूर्वीची शिकवण नाट्याभिनय क्षेत्रातील विविध अभ्यासक्रमांमुळे आता मागे पडली आहे. अभिनयाची इच्छाशक्ती व नाट्यक्षेत्राची तळमळ असणारेच या क्षेत्रात तग धरू शकतात. प्रसिद्धीसाठी हपापलेल्यांना हे क्षेत्र उपयोगी नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकूनच योग्य तो निर्णय घ्यावा.''

*** ग्रामीण, कृषी आधारित उद्योगांना बळकटी देणे गरजेचे**

''कृषी क्षेत्रात केवळ पैसा ओतून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणार नाही. त्यासाठी ग्रामीण उद्योग, कृषीवर आधारलेल्या उद्योगांना बळकटी द्यावी लागेल,'' असे माजी राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांनी पुणे येथे सांगितले.

'कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम'चे (कास्प) अध्यक्ष डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी लिहिलेल्या 'एक्स्पीरिमेंट्स अँड एक्स्पीरिअन्सेस इन सोशल वर्क प्रॅक्टिस' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. वेंकटरमण यांच्या हस्ते झाले. 'कास्प'च्या वयोवर्धन केंद्रास नुकतीच आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. या संस्थेच्या बोधचिन्हाचे प्रकाशनही श्री. वेंकटरमण यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. गोखले यांच्या पुस्तकाचे संपादन प्रा. सौ. कॉनी बार्लो व डॉ. डेव्हिड इस्टी यांनी केले आहे. त्यांचा चित्रित संदेश या वेळी सादर करण्यात आला. डॉ. गोखले यांनी 'कास्प'च्या वयोवर्धन केंद्राकडे 'नागरी भागातील ज्येष्ठ नागरिकांची समस्या' या विषयातील संशोधनाची जबाबदारी सोपविण्यात आल्याची माहिती दिली. 'कास्प'चे सचिव आर. एच. बेलवडी यांनी आभार मानले.

*** साहित्य कलावर्धिनीतर्फे डॉ. मेहेंदळे यांचा सत्कार**

ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक डॉ. विश्वास मेहेंदळे यांचा भारतीय साहित्य कला वर्धिनीच्या वतीने रंगकर्मी चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते सत्कार झाला.

'मला भेटलेली माणसे' या कार्यक्रमाचे एक हजार प्रयोग पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी 'भारतीय साहित्य कला वर्धिनी' या संस्थेच्या नामफलकाचे उद्घाटन सिम्बॉयसिस संस्थेचे अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी केले.

उमेदीच्या काळात कारकीर्द गाजवलेल्या विचारवंत, साहित्यिक यांची वृद्धापकाळात उपेक्षा होते. त्यांचा सत्कार व्हावा, त्यांना सन्मान मिळावा आणि त्यांच्या कर्तृत्वाला उजाळा मिळावा. त्याचप्रमाणे नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे, यासाठी संस्था काम करणार असल्याचे अध्यक्षा रंजना फडके यांनी सांगितले.

*** बुश यांच्या विजयामुळे पुस्तकांचा खप वाढला**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बुश यांच्या विजयामुळे अमेरिकेत काहीजणांची निराशा झाली असली तरी काही प्रकाशक मात्र त्यांच्याकडच्या पुस्तकांचा खप प्रचंड वाढल्यामुळे बेहद्द खूष आहेत. बुश यांच्या धोरणांवर टीका करणाऱ्या पुस्तकांचाही विक्रमी खप होत असल्याने काही प्रकाशकांची चांदी झाली आहे.

थॉमस फ्रँक यांच्या 'व्हॉट्स द मॅटर विथ कन्सास?' या पुस्तकाला प्रचंड मागणी आहे. डेमोक्रॅट पक्षाच्या पराभवावर फ्रँक यांनी या पुस्तकात सविस्तर टिपणी केली आहे. अमेरिकेतल्या 'बेस्टसेलर्स'मध्ये हे पुस्तक आता दोन नंबरवर पोचले आहे. या पुस्तकाचा पुरेसा साठा असल्याचे प्रकाशक जॉन स्टर्लिंग यांनी सांगितले.

'डोन्ट थिंक ऑफ अॅन एलिफंट' या जॉर्ज लॅकॉफ यांच्या पुस्तकालाही मोठी मागणी आहे. त्यात आधीच्या अमेरिकन अध्यक्षांच्या आयुष्यावर लेखकाने भाष्य केलेले आहे. लॅकॉफ यांचे 'मॉरल पॉलिटिक्स' हे पुस्तक दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाले. त्यात उदारमतवादी पुन्हा सत्तेवर कसे येऊ शकतात, याबद्दलचे विचार मांडले आहेत.

## * संस्कृत टिकविण्यासाठी राष्ट्रीय संस्कृत संस्थान

'देव: देवौ देवा:' प्रथमा अशी संथा घेण्याचे दिवस गेलेत असे वाटत असतानाच संस्कृत भाषेला टिकविण्यासाठी काहीजण खटपट करताहेत. संस्कृतचा मुळापासून अभ्यास करण्यासाठी विद्यापीठांमध्ये अर्ज करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. संस्कृत भाषेला दुसरी भाषा म्हणून घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढली आहे.

इंग्रजी भाषेचे प्राबल्य वाढत असल्याचे आज कुणीच नाकारू शकत नाही. त्यात मातृभाषेसह अन्य एका भाषेचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी संस्कृतला पसंती द्यावी, हा लोकांच्या मनोवृत्तीत झालेला बदलच म्हणायला हवा. दिल्लीत भाषेसाठी विशेष वर्ग, अर्थात क्लास चालविणाऱ्या शिक्षकांनी संस्कृतसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी विशेष प्रवेश परीक्षा ठेवण्याचे ठरविले आहे. संस्कृत भाषेत चांगल्या मार्कांनी पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही वाढले आहे.

संस्कृत भाषा शाळेमध्ये विषय म्हणून असला तरी त्यापुढे त्याचे शिक्षण घेतले जात नसे. सुमारे ३० वर्षांपूर्वी या भाषेकडे दुर्लक्ष केले गेले सहाजिकच लोकांमध्ये या भाषेबद्दल नावड निर्माण झाली, असे 'राष्ट्रीय संस्कृत संस्थान'चे उपकुलगुरु कुटुंब शास्त्री यांनी सांगितले. या भाषेचा सखोलपणे अभ्यास आणि त्यावर संशोधन होण्यासाठी विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणावर उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## * चीनमधील प्राचीन विश्वकोशाचा लिलाव

चीनमधील सर्वात प्राचीन विश्वकोशाचा लिलाव करण्याचा निर्णय चीन सरकारने घेतला असून, 'सानिका' हा महाग्रंथ लवकरच मोठी बोली बोलणाऱ्याच्या हाती पडणार आहे. १६४४ ते १९११ दरम्यान चीनवर सत्ता गाजविणाऱ्या किंङ्साम्राज्याच्या कालखंडात हा विश्वकोश बनविण्यात आला होता.

एक हजार १८४ खंडांच्या या महाकाय विश्वकोशाच्या सात आवृत्त्या उपलब्ध आहेत. १७३६ ते १७९५ दरम्यान अधिराज्य गाजविणारा किंङ्साम्राज्याचा सम्राट कियान्लाँङ् याची मोहोर या सर्व आवृत्त्यांवर उमटवलेली दिसते.

याच सम्राटाच्या निरीक्षणाखाली १७७३ ते १७८४ या ११ वर्षांच्या काळात 'सिनिका' साठी माहिती गोळा करण्याचे काम पार पडले होते. याकरिता विविध क्षेत्रांतील ३ हजार ८०० तज्ज्ञांनी अथक परिश्रम घेतले होते. त्या काळात केवळ हाताने वह्या शिवण्याचे कसब अवगत होते. त्यामुळे या विश्वकोशाची बांधणी पूर्ण होण्यास चार वर्षे लागली.



सिनिकाची मूळ आवृत्ती त्या काळात 'वेन यॉन गे' या खास ग्रंथालयात ठेवण्यात आली होती. आधुनिक काळात या ग्रंथालयाच्या नावाने सानिकाच्या ताजी आवृत्ती काढण्यात आली. तिच्यासाठी १०० तज्ज्ञांनी परिश्रम घेतले.

लिलाव होणार आहे तो या ताज्या 'वेन यॉन गे' आवृत्तीमधील ग्रंथांचा. आधुनिक काळातही ग्रंथांचा प्राचीनपणा टिकविण्यासाठी या कामी हाताने बनविण्यात येणारा झुआन कागद वापरण्यात आला असून त्यावरचा मजकूरही प्राचीन चित्रलिपीतच आहे. पारंपरिक छापाईपद्धतीने हे ग्रंथ छापण्यात आले असून, त्यांची बांधणी हाताने केली आहे!

## * अॅन रँडच्या कादंबरीचा मराठी अनुवाद

''अॅन रँडच्या'' अॅटलास श्रग्ड' या गाजलेल्या कादंबरीचा मराठी संक्षिप्त अनुवाद मराठीत प्रसिद्ध झाल्यामुळे, तिच्या जीवनदृष्टीची आणि प्रतिभेची झेप किती विलक्षण होती, याची आपल्या वाचकांना कल्पना येऊ शकेल. अॅन रँड वाचकांना झपाटून टाकते. जो तिचे साहित्य वाचतो तो तिचा जन्माचा भक्त होतो.'' असे मत शंकर सारडा यांनी 'युगान्त' (अनुवादक - सु. वि. पारखी) चे प्रकाशन करताना प्रकट केले. शिवम प्रकाशनचे नागनाथ काळे यांनी अॅन रँडच्या वारसांची अधिकृत परवानगी घेऊन हा अनुवाद प्रसिद्ध केला आहे. ह. मो. मराठे यांनीही यावेळी आपले विचार मांडले. सूत्रसंचालन स्नेहसुधा कुलकर्णी आणि ज्योत्स्ना चांदगुडे यांनी केले.

## * साध्या, सोप्या भाषेमुळे वरकडांची कविता भावते


''साधी, सोपी भाषा व सद्य:स्थितीवर विनोदी अंगाने फटकारे मारण्याची शैली, ही संजय वरकड यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे त्यांच्या कविता सर्वसामान्यांना भावतात,'' असे प्रतिपादन 'सकाळ'च्या सरव्यवस्थापक विजया पाटील यांनी येथे केले.

'मॅकमिलन' प्रकाशनने प्रकाशित केलेल्या संजय वरकड यांच्या 'राजकारणाच्या मांडवाखालून' या कवितासंग्रहाचे प्रकाशन विजया पाटील यांच्या हस्ते नऊ नोव्हेंबरला तापडिया नाट्यगृहात झाले. प्रमुख पाहुणे म्हणून कविवर्य प्रा. फ. मुं. शिंदे, 'मॅकमिलन'चे वरिष्ठ व्यवस्थापक दिलीप लाठी उपस्थित होते.

सौ. पाटील म्हणाल्या, ''श्री. वरकड यांनी सामाजिक भान ठेवून राजकारणावर लेखन केले आहे. आता त्यांनी राजकारणाच्या मांडवाबाहेर जाऊन विविध क्षेत्रांतील घडामोडींचीही दखल घ्यावी. त्यासाठी भारतभर प्रवास केल्यास अनुभवविश्व व्यापक होईल. 'सकाळ'मधील 'शिदोरी' सदराच्या माध्यमातून त्यांच्या 'चारोळ्या' राज्यभरातील वाचकांपर्यंत पोचल्या.''

प्रा. शिंदे म्हणाले,''मराठी साहित्यात विडंबन, उपरोध, उपहासात्मक लेखनाची परंपरा दत्तू बांदेकर, आचार्य अत्रे, रामदास फुटाणे, मंगेश पाडगावकर यांनी समृद्ध केली आहे. संजय वरकड हा त्याच कुळातील कवी आहे. केवळ हसविणे हा नव्हे, तर अंतर्मुख करणे हा या लेखनामागचा उद्देश असतो. भाष्य करताना भूमिका असावी. विनोदबुद्धीही आवश्यक आहे. माणुसकी हे विद्रोहाचे, सद्भावना हे राजकारणाचे अधिष्ठान असते. सद्भावनेतून केलेली टीकाही आवडणारी असते.''

❐




# फ्रॉम रशिया वुइथ लव्ह

**इयान फ्लेमिंग  अनु. विजय देवधर**

**जेम्स बाँडवर एक रशियन तरुणी फिदा होते आणि -**

१९५३ मध्ये इआन फ्लेमिंगची 'कॅसिनो रॉयल' ही थरारकथा प्रसिद्ध झाली आणि जेम्स बाँड ही एक अफलातून व्यक्तिरेखा वाचकांपुढे आली. ग्रेट ब्रिटनच्या गुप्तहेरखात्यातील जेम्स बाँडला ००७ चा दर्जा होता, म्हणजे कोणालाही कसेही ठार मारण्याचा त्याला मुक्त परवाना होता. त्याच्या हालचाली चपळ होत्या, शत्रूचा व इतर देशांच्या हेरांचा शोध घेऊन त्यांचा बंदोबस्त करण्यात त्याचा हातखंडा होता आणि सुंदर तरुणींना भुरळ घालण्याची कला त्याला उपजतच अवगत होती. तो कुठल्याही कामगिरीवर निघाला तरी त्याच्यावर फिदा असणारी एखादी मन्मथपुतळी, सौंदर्यलतिका त्याच्या गळ्यात पडायचीच! त्याच्याबरोबर मार्टिनीचे पेग घेत उत्तम रुचकर खाद्यपदार्थांचा समाचार घेण्यातही त्याचा चोखंदळपणा प्रकट होई. पौरुषाचा मूर्तिमंत पुतळाच असा हा गुप्तहेर बेदरकारपणे शस्त्र चालवी. आपली कामगिरी पार पाडताना कोणाचाही मुलाहिजा तो ठेवत नसे. आणि कुठल्याही प्रकारचा अपराधभाव त्याच्या मनात नसे. जेम्स बाँडच्या रूपाने सिक्रेट सर्व्हिसमध्ये काम करणारा एक नव्याच प्रकारचा नायक इआन फ्लेमिंगने वाचकांपुढे उभा केला. त्याच्या हाती अत्याधुनिक प्रकारची इलेक्ट्रॉनिक संहारशस्त्रे दिली आणि देशोदेशींच्या हेरखात्याशी तसेच अंडरवर्ल्डस्शी त्याला सामना करायला लावून त्याचे बुद्धिचापल्य निर्विवाद सिद्ध व्हावे अशी दक्षता इआन फ्लेमिंगने घेतली. 'कॅसिनो रॉयल'च्या पाठोपाठ त्याच्या डॉ. नो, डायमंडस् आर फॉर एव्हर, वगैरे कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या. परंतु त्या तेवढ्या खपल्या नाहीत. त्यावेळी रशिया-अमेरिका यांच्यातील शीतयुद्धाची धूमश्चक्री चालू होती. त्या पार्श्वभूमीचा वापर करून इआन फ्लेमिंग याने 'फ्रॉम रशिया वुईथ लव्ह' या नावाने १९५७ मध्ये पाचवी थरारकथा प्रसिद्ध केली. तिच्या नावामुळे असेल की तिच्यातील खमंग मालमसाल्यामुळे असेल, तिची विक्री मात्र झपाट्याने होत राहिली. आणि अनेक समीक्षकांनी जेम्स बाँडची सर्वात प्रभावी थरारकथा असा तिचा गौरव केला. पुढे जेम्स



बाँडचे चित्रपट निघू लागले आणि ते गाजू लागले. त्यामुळे आजवर बेताचाच खप असणारी जेम्स बाँडची पुस्तके जोरात खपू लागली आणि बेस्टसेलर्सच्या यादीत मिरवू लागली. जेम्स बाँडच्या रूपाने केवळ हेरगिरीच्याच क्षेत्रातलाच नव्हे तर अवघ्या तरुणाईला आदर्श ठरेल असा वीरनायक ही प्रतिमा तरुण पिढीच्या मनावर ठसली आणि त्याच्या जीवनशैलीचे अनुकरण करण्यात तरुणांना पुरुषार्थ वाटू लागला. थरारकथेचा काल्पनिक नायक अशा प्रकारे तरुण पिढीचा आदर्श ठरला.

जेम्स बाँडची निर्मिती करताना आणि त्याला वेगवेगळ्या साहसी कृत्यात सहभागी करताना इआन फ्लेमिंगने आपला सिक्रेट सर्व्हिसमधला सगळा अनुभव पणाला लावला. त्यामुळे जेम्स बाँडवरील सर्वच थरारकथांत तत्कालीन वास्तवाचे उत्तम प्रतिबिंब पडलेले आहे. त्या त्या देशांच्या हेरगिरीच्या यंत्रणांच्या कामकाजाची अचूक माहिती या सर्व कथानकांना वास्तवाची डूब देते; तसेच राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या कटकारस्थानांची, शह-प्रतिशहाचीही रोमांचकारक तपशीलवार माहिती देते. 'गोल्ड फिंगर'मध्ये सोन्याच्या चोरट्या आयात-निर्यातीचा व्यापार कसा चालतो याचे तपशील येतात. अमेरिकेच्या फोर्ट नॉक्समध्ये अमेरिकेचा सगळा सुवर्णसाठा प्रचंड बंदोबस्तात ठेवण्यात आला आहे. त्याचे वर्णन अत्यंत बारकाईने गोल्डफिंगरमध्ये इआन फ्लेमिंगने केले आहे. ही सर्व इनसाइड इन्फर्मेशन वाचकांना स्तिमित करते आणि या माहितीच्या आधारे कथानकाची गुंफण करताना इआन फ्लेमिंग त्यात अनेक अटीतटीचे आणि जीवावरचे प्रसंग चपखलपणे वापरत राहतो. अत्यंत कमी कालावधीत एकापाठोपाठ एक अशा घटना वेगाने घडत जातात आणि वाचकाला आश्चर्याचे धक्के बसत राहतात. कथानकात पुढे काय घडेल याबद्दल वाचक मनाशी काही अंदाज बांधत असतो आणि जेम्स बाँड काहीतरी नवेच, वेगळेच वळण त्या कथानकाला देत असतो. आणि त्यामुळे वाचकाला अनपेक्षित आश्चर्य वाटणे अटळ ठरते. असे अनपेक्षित आश्चर्याचे धक्के देण्याचे इआन फ्लेमिंगचे कौशल्य अचाट आहे. त्यामुळेच त्याच्या हयातीत जेम्स बाँडच्या चित्रपटांनी आणि पुस्तकांनी त्याला अफाट पैसा मिळवून दिलाच; त्याच्या मृत्यूनंतरही जेम्स बाँडच्या थरारकथांचा खप कमी होण्याऐवजी वाढतच आहे. अजूनही त्याच्या उत्कंठावर्धक कथांचे मायाजाल नव्याजुन्या वाचकवर्गाला आकृष्ट करीत आहे.

**त्याचा चेहरा स्वच्छ नितळ, डोळे मोठे,नाक लांब, सरळ आणि धरधरीत, जिवणी रुंद आणि तिच्या ठेवणीवरून तो माणूस प्रसंगी अत्यंत कठोर बनू शकतो असं प्रतीत होत होतं.**

'फ्रॉम रशिया वुइथ लव्ह' या थरारकथेचे मध्यवर्ती सूत्र तसे अगदी साधे सोपे आहे. १९५७ साली प्रसिद्ध झालेली ही थरारकथा, त्यावेळी युरोप-अमेरिकेशी रशियाचे शीतयुद्ध

ऐन भरात होते. क्रूशेवचा दबदबा होता. अशावेळी इंग्लंड-अमेरिकेच्या गुप्तहेर यंत्रणेची विश्वासार्हता मातीमोल करून जगभरात तिची नाचक्की करावी असे रशियन 'स्मेर्श' या गुप्तचर संघटनेच्या वरिष्ठांना वाटते. सोव्हिएत रशियातील स्मेर्श हे खाते गुप्तहेरांना मृत्युदंड देण्यासाठी, घातपात व हत्या घडवून आणण्यासाठी स्थापन झालेले होते. जनरल ग्रबोझाबोयस्कीकोव (जी) हा त्याचा मुख्य अधिकारी होता. जगभरच्या गुप्तचरयंत्रणांची अद्ययावत माहिती मिळावी म्हणून या एमजीबी संघटनेने देशोदेशीच्या गुप्तचर यंत्रणात आपले एजंट घुसवलेले होते. विविध गुप्तचर यंत्रणांच्या प्रमुखांशी चर्चा करून जनरल 'जी' इंग्लिश हेर जेम्स बाँड याच्यावरच्या डेथ वॉरन्टवर सही करतो.

'गुन्हा - राज्याचा शत्रू...' 'अब्रू जाईल अशी बदनामीची व्यवस्था करून मगच त्याला ठार मारा' असाही शेरा डेथ वॉरन्टवर मारण्यात येतो.

**ब्रिटिश सिक्रेट सर्व्हिसमध्ये असा एखादा असामान्य माणूस कोण आहे? जो आपलं लक्ष्य बनू शकेल? ज्याच्या मृत्यूमुळे सबंध जगात प्रचंड खळबळ माजेल?**

त्याच्या वधाची योजना आखण्याची कामगिरी कर्नल रोझा क्लब (ओतझोत - ऑपरेशन्स अँड एक्झिक्युशन्स विभागाची क्रूर प्रमुख) आणि हत्या विभागाचा प्रमुख क्रोन्स्टीन यांच्यावर सोपवण्यात येते. ''आपल्या गुप्तवार्ता खात्याच्या दृष्टीनं मोठी विजयश्री खेचून आणेल अशी काहीतरी कामगिरी यापुढे करून दाखवली नाही तर आपलं काही खरं नाही,... आपल्या श्रेष्ठींच्या रोषाला आपल्याला बळी पडावं लागेल. आणि ही गोष्ट अर्थातच फार नामुष्कीची आणि अप्रिय असेल.'' हे त्यांना बजावून सांगण्यात येते.

जेम्स बाँड हा ब्रिटिश सिक्रेट सर्व्हिसचा सर्वात महत्त्वाचा एजंट, उत्तम पिस्तुलबाज, बॉक्सर, सुरा फेकण्यात निष्णात. अति धूम्रपान करणारा. दुर्गुण - मद्यपान, सुंदर स्त्रियांचा मोह, विषयासक्त. बेदरकार, सदोदित एक .२५ ॲटोमॅटिक बेरेटा पिस्तूल बाळगतो. त्यात आठ गोळ्या. डाव्या हातावर एक धारदार चाकू. स्टीलचं आवरण असलेले बूट. ज्युडोपटू. वेदना सहन करण्याची अचाट शक्ती. अत्यंत घातकी आणि धंदेवाईक दहशतवादी आणि हेर. १९३८ पासून ब्रिटिश हेरखात्यात काम. सीएमजी ॲवार्डचा मानकरी. ००७ हा सांकेतिक नंबर. कोणाही हेराला ठार मारण्याचा अधिकार. असामान्य योग्यता आणि महत्त्व...''

रोझा क्लेब - थोराड. उंची ५ फूट ४ इंच. राकट व पुरुषी. मान बसकी. जाड. खांदे रुंद, जाडजूड बेढब हात. गलेलठ्ठ मांड्या व पोटऱ्या. स्त्रीला न शोभणाऱ्या. गरगरीत नितंब व फुगीर कणखर व बलिष्ट देह. तांबूस केसांचा घट्ट अंबाडा. पिवळट घारे डोळे. नजर थंडे व भेदक नाक पाचरीसारखं लांब, चेहऱ्यावर पावडरचा थापडलेला थर. सिगारेटची सवय. निकोटिनचे पिवळट किरण असलेले चपटे, पसरट दात. ...सोव्हिएट रशियातील



सर्वात सामर्थ्यशाली आणि दहशत उत्पन्न करणारी उग्र कठोर स्त्री. तिची चमत्कारिक कामप्रवृत्ती. शरीरसुख हा वेदनादायक खरजेइतका तिटकाऱ्याचा विषय. उदासीन मनोकायिक कामप्रवृत्तीमुळे अंगी आलेला थंड निष्ठुरपणा. एकांडेपणे काम करण्याची आवड. लांडग्यासारखी क्रूर, अनेक नेत्यांना यमसदनी पाठवून, बेरियाला मृत्यूदंड दिल्यावर ऑपरेशन्स डिपार्टमेंटचे प्रमुखपद मिळवण्यात तिला मिळालेले यश...गुन्हेगाराला बोलते करण्यासाठी ती अत्यंत क्रूर मार्गांचा लीलया वापर करी. त्यामुळे सर्वत्र तिचा दरारा!

जेम्स बाँडला तरुण स्त्रियांचा मोह पडतो हे लक्षात घेऊन त्याला मोहपाशात ओढण्यासाठी तातिआना रोमानोव्हा या मदनमस्त तरुणीची योजना करण्याचा घाट रोझा क्लेब घालते. जेम्स बाँडची माहिती तिला देऊन त्याला आपल्या जाळ्यात ओढण्याची कामगिरी तिच्यावर सोपवते. ''तातिआना, आतापर्यंत तू उत्तम काम केलं आहेस. म्हणून तुझी आता एका महत्त्वाच्या खास कामगिरीसाठी निवड करण्यात येत आहे. कॉमरेड कॉर्पोरैल, ही कामगिरी तू यशस्वीपणे पार पाडलीस तर स्टेट सिक्युरिटीची कॅप्टन म्हणून तुला बढती मिळेल.''

**तिचे केस दाट तपकिरी रंगाचे चमकदार, मऊ होते. तिची त्वचा नितळ, मुलायम आणि चेहरा विलक्षण तजेलदार नि डोळे टपोरे आणि पाणिदार होते. ती अत्यंत सुंदर व देखणी होती.**

– तातिआनाला रोझा क्लेबची ती ऑफर म्हणजे एक सापळा वाटतो. ''अवघ्या चोवीस वर्षांच्या मुलीला चक्क कॅप्टन म्हणून बढती? मांसाचं अमिष लावलेल्या, तीक्ष्ण दातेरी सापळ्याजवळ थबकलेल्या श्वापदासारखी आपली अवस्था झालीय असे वाटून ती पार थिजून जाते. पुढे रोझा तिला विचारते, ''रतिक्रीडेतून तुला आनंद मिळतो का? एखाद्या पुरुषाशी प्रेम नसतानाही शय्यासोबत करावी लागली तर - तुला आनंद घेता येईल का?''

''तो पुरुष कसा असेल यावर ते अवलंबून राहील.'' असे तातिआनाचे उत्तर आल्यावर रोझा तिला जेम्स बाँडचा फोटो दाखवते, आणि म्हणते, ''हा फोटो तुझ्याजवळ ठेव. या माणसाच्या प्रेमात तुला पडायचंय... प्रेमाचा खेळ खेळायचाय... त्याच कामासाठी तुझी निवड झालीय. हे काम अगदी सोपं आणि आकर्षक आहे. सविस्तर तपशील तुला नंतर कळेल. यापुढं काही काळ तुला प्रशिक्षण देण्यात येईल. हा ब्रिटिश गुप्तहेर आहे. त्याला तू प्रेमपाशात ओढ आणि आपल्याबरोबर तुला इंग्लंडमध्ये नेण्यास त्याला तू भाग पाड. ब्रिटिशांची दिशाभूल करणारी बनावट व फसवी माहिती त्याला देऊन आपण त्यांना गंडवायचे आहे. या मोहिमेच्या निमित्तानं तुला आरामात परदेश प्रवास करायला मिळेल. तुझी चंगळ आहे....काम झालं की तुझी आम्ही सुटका करू. तुला परत रशियात आणू...''

या मोहिमेचा दुसरा सूत्रधार क्रोन्स्टीन पुढचे तपशील ठरवतो, ''ही पोरगी आणि बाँड

यांची पहिली भेट घडवून आणायच्या दृष्टीनं मी इस्तंबूल हे ठिकाण निवडलंय. आपल्या हेरांचं तिथं उत्तम जाळं आहे. ब्रिटिश गुप्तहेरांचंही तिथं छोटं केंद्र आहे... पोरीशी गाठभेट झाल्यावर जेम्स बाँडची हत्या कशी करायची, त्याने आत्महत्या केल्याचा गवगवा करायचा. हेरगिरीच्या पार्श्वभूमीवरच्या या सेक्स स्कँडलची तिखटमीठ लावून कशी प्रसिद्धी करायची याची योजना मी आखतोय... त्याला ठार मारण्यासाठी मी ग्रॅनिटस्की - रेड ग्रान्ट याची निवड केलीय...'' त्या पोरीच्या आणि जेम्स बाँडच्या प्रणयप्रसंगाची चोरून फिल्म घेण्यासाठी कॅमेरामनला इस्तंबूलला पाठवू... कमालीची गुप्तता पाळून ब्रिटिश हेरखात्याची जगभर नाचक्की करण्याचा हा घाट आपण यशस्वी करून दाखवू.''

– आता जेम्स बाँडची आणि तातिआना रोमानोव्हा यांची गाठ कशी पडणार? जेम्स बाँडला तिच्यात रस वाटावा यासाठी काय अमिष गळाला लावावे लागणार? तिच्या भेटीसाठी जेम्स बाँडने लंडनहून इस्तंबूलला यावे - असे जबरदस्त अमिष काय असू शकेल? या सर्व बाबांचा सांगोपांग विचार करण्यात येतो आणि जेम्स बाँडभोवती जाळे विणण्यात रशियन हेरखाते यशस्वी होते.

**'तिचं म्हणणं असं, की त्यांच्याकडल्या तुमच्या फायलीत तिनं तुमचा फोटो पाहिला आणि त्याचक्षणी तिचं मन तुमच्यावर जडलं.तुमचं देखणेपण, तुमचं रूप वगैरे तिला आवडलं'**

त्यासाठी इस्तंबूल येथील ब्रिटिश सिक्रेट सर्व्हिसचा, टी स्टेशनचा प्रमुख डार्को करीम याचा मध्यस्थ म्हणून वापर करण्याचा बनाव रचला जातो. तातिआनाला सायफर ऑफिसर -सांकेतिक गुप्त लिपीचे डिकोडिंग करणारी अधिकारी म्हणून इस्तंबूलला पाठविण्यात येते. त्यासाठी एक खास उपकरण सायफर स्पेक्टर मशीन हे तिच्या दिमतीला असते. रशियनांच्या सगळ्या गुप्त सांकेतिक संदेशाच्या दळणवळणाचा, टॉप सिक्रेट संदेशांचा गुप्त खजिनाच या स्पेक्टर मशीनद्वारे उपलब्ध होत असतो. तेव्हा तातिआना जेम्स बाँडला आपल्या जाळ्यात अडकविण्यासाठी जो बनाव रचते त्यात आपण आपल्याबरोबर हे स्पेक्टर मशीनही उपयोगात आणण्याची कल्पना राबवते.

आता नेमकी जेम्स बाँडचीच शिकार कशी करायची?

त्यासाठी एका काल्पनिक स्टोरीचा आधार घेतला जातो. ''सेंट्रल इंडेक्स रेकॉर्डस विभागात काम करताना जेम्स बाँडची फाइल माझ्या पाहण्यात आली. त्याचा पराक्रम बघून मी थक्क झाले, एकदम त्याच्या प्रेमात पडले. त्याला गाठायचेच असे ठरवले.'' असा निरोप ती इस्तंबूलमधील टी स्टेशनचा प्रमुख करीम यांच्या कानावर घालते, आणि ''कसेही करून जेम्स बाँडला इस्तंबूलला बोलावून घ्या... मी त्याच्याबरोबर ब्रिटनला डिफेक्ट होईन. बरोबर हवे तर स्पेक्टर मशीनही...''



डार्को करीम हा संदेश जेम्स बाँडचा बॉस एम याच्यापर्यंत पोचवतो. एमला रशियाच्या सांकेतिक गुप्त संदेशांचा उलगडा करणाऱ्या मशीनबद्दल आकर्षण वाटते. तो जेम्स बाँडला इस्तंबूलला जाऊन या पोरीची गाठ घे; कसेही करून त्या यंत्रासह तिला इंग्लंडमध्ये घेऊन ये, असा आदेश देतो. जेम्स बाँड थोडा विरोध करतो, ''इतकी अफाट वेडपट गोष्ट मी ऐकली नव्हती.'' असे म्हणतो. पण एम त्याला सायफर मशीनसाठी हे सगळे कर म्हणून समजावून सांगतो.

...तर हा सगळा बनाव जमवून आणला जातो.


तातिआनाच्या भेटीसाठी जेम्स बाँड इस्तंबूलला येतो. डार्को करीम त्याला तेथील सर्व माहिती देतो. तातिआनाचा निरोप आल्यावर कळवतो असे सांगतो... जेम्स बाँड डार्कोच्या ऑफिसला भेट देऊन हॉटेलच्या आपल्या खोलीत येतो. झोपण्याची तयारी करतो... तर त्याच्या बिछान्यात त्याला टपोऱ्या निळ्या डोळ्यांची एक सुंदर तरुणी दिसते. ''मी तातिआना... याच हॉटेलात उतरलेय. दोन मजले उतरून खाली आलेय... फोटोत तुम्ही दिसताय तसेच प्रत्यक्षात आहात... तुमच्या पाश्चिमात्त्य मुलींइतकी मी सुंदर आहे का हो?...''

**'काहीतरी आश्चर्यकारक नि धक्कादायक धटना धडणार आहे.त्यासाठी सावध रहा.या प्रवासमार्गावर तुमच्या आणि माझ्या दोघांच्याही बाबतीत काहीतरी अघटित घडणार आहे.'**

– यापुढे काय होते, तातिआना त्याच्याबरोबर लंडनला जायला ओरिएंट एक्स्प्रेस या रेल्वेतून प्रवास करताना काय काय घडते, ते वाचकांनी प्रत्यक्षच वाचलेले बरे!

पन्नासएक वर्षांपूर्वीची ही कादंबरी – पण आजही ती हाती घेतल्यावर खाली ठेववत नाही. तिच्यातील कथानकाचा डोलारा अगदी तकलादू असला तरी तो एकदा स्वीकारला की रोझा क्लेब, डार्को करीम, रेड ग्रांट, झोरा आणि व्हिडा जिप्सी, तातिआना रोमानोवा, जिप्सी कबिल्याचा प्रमुख व्हावरा वगैरे व्यक्तिरेखा आपल्या मनाचा ठाव घेतात. त्यातली खाद्यपदार्थांची, इमारतींची, स्त्रीपुरुषांची वर्णनेही चित्रदर्शी वाटतात. घटनांमधील नाट्याला गतिमानतेमुळे अधिकच रंग भरतो. प्रत्येक पावलागणिक शह-काटशह, डबल क्रॉसिंग हे प्रकार असतातच. त्यामुळे पुढे काय होणार, कथानक कसे वळण घेणार याबद्दलचे कुतूहल व औत्सुक्य वाढत राहते. 'फ्रॉम रशिया वुइथ लव्ह' ही अफलातून थरारकथा इआन फ्लेमिंगच्या कथाकथनकौशल्याचे हृदयंगम दर्शन घडवते.

**पृष्ठे : ३६४ ● किंमत : २५० रु. ● सभासदांना : १७५ रु. ● पोस्टेज : २० रु.**




# अंतर-पर्व

**भावानुवाद डॉ. सुनीती अशोक देशपांडे**

**सद्यःकालातील**
**रशियन कथांचा नजराणा**

मुंबईच्या कल्चरल सेंटर ऑफ रशिया मध्ये रशियन भाषा संस्थेच्या डायरेक्टर म्हणून काम करणाऱ्या डॉ. सुनीती अशोक देशपांडे यांनी आजवर सुमारे तीनशे रशियन कथांचे मराठी अनुवाद सादर केलेले आहेत. 'फुलांचे बोल' आणि 'कथांतर' हे त्यांचे दोन कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाले आहेत. अंतर-पर्व हा त्यांचा तिसरा कथासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. मॅक्झिम गॉर्की, ॲलेक्सी टॉलस्टॉय यांच्या कथांचा अपवाद वगळता १९६० ते १९८० या काळात लिहिल्या गेलेल्या नऊ कथांचा या संग्रहात समावेश केला गेला आहे आणि त्यांच्या लेखकांमध्ये व्हेलेंटिन रासपुतिन, अलेक्झांडर सोल्झेनित्सिन, वसीली शुकशिन, कॉन्टंटाइन फेजिन, यूरी याकवलेव प्रभृतींची नावे आढळतात. मूळ रशियन भाषेतून मराठीत आलेल्या या कथा असल्याने त्यांची अपूर्वाई विशेष.

रशियाच्या छोट्या शहरातील आणि गावातील मोकळ्याढाकळ्या जीवनाचे चित्रण या कथांमध्ये झालेले आहे आणि ते गाभ्याला हात घालणारे आहे. रशियन लेखक अगदी सहज आपल्या लेखणीनं माणसाच्या अंत:करणाला स्पर्श करत आहेत असं वाटतं, आणि या लेखणीतून झरता झरता माणूस कसा कोण जाणे अतिशय सोपा होत राहतो. आपलं जीवन जगत असता आपला मूळ प्रवृत्तींच्या प्रवाहाबरोबर तो असहायपणे वाहूनही जात असतो.'' असे प्रस्तावनाकार गंगाधर गाडगीळांना जाणवते. माणूस सोपा होत जाणे, प्रवाहपतित होऊन असहाय बनणे हे या कथांतून प्रकर्षाने जाणवत असेल तर त्याचा सामाजिक संदर्भ, राजकीय संदर्भही महत्त्वाचा ठरतो. रशियात साम्यवादी राजवटीत माणसाच्या स्वांतत्र्याचा व आकांक्षांचा संकोच होत गेला आणि त्यामुळे वैयक्तिक आकांक्षांना मर्यादा पडत गेल्या. त्याचे प्रतिबिंब नकळत या कथांमध्ये पडलेले असणार!

मॅक्झिम गॉर्कीच्या 'एक लाट तोडी दोघां' या कथेचा सर्वात प्रभावी म्हणून



गाडगीळ उल्लेख करतात. जिप्सी जमातीतील ही प्रेमकथा. कलंदर झुबेर आणि सौंदर्यवती रादा यांना एकमेकांबद्दल आकर्षण वाटते. परंतु दोघेही मनस्वी आणि मानी. झुबेरला वाटते की आपल्यापुढे रादाने नतमस्तक होऊन प्रेमाची कबुली द्यावी. तर रादाची अपेक्षा झुबेरने आपल्याला मागणी घालावी. शेवटी झुबेर तिच्या इच्छेप्रमाणे तिच्यापुढे झुकतो, पण त्याचवेळी तिच्या पोटात खंजीर खुपसतो. रादा खाली कोसळल्याबरोबर तिचे वडील पाठमोऱ्या झुबेरच्या पाठीत खंजीराने वार करतात. झुबेरला याची कल्पना नसते असे नाही; पण तो तरीही तसे होऊ देतो. दोन तुल्यबळ लाटा एकमेकींचा पाठलाग करतात; पण त्या एकरूप होऊ शकत नाहीत. या वास्तवाचे या कथेतले हे रूप सुन्न करणारे आहे.

अलेक्झांडर सोल्झेनित्सिन हा नोबेल पुरस्काराचा मानकरी. (१९६२). स्टॅलिनच्या कारकीर्दीत त्याच्यावर हद्दपारीची पाळी आली. रशियाच्या विघटनानंतर १९९४ साली त्याला सरकारने सन्मानपूर्वक रशियात बोलावून घेतले. 'म्हणे अरेरे' ही त्याची या पुस्तकातील कथा एका इंजिनिअर व्यक्तीच्या उपेक्षेची कहाणी सांगते. तसेच नोकरशाही मनोवृत्तीचे भेदक दर्शन घडवते. ॲना मोदेस्तवना हिला आपल्या जन्मगावाजवळच्या प्रदेशात वैराण वाळवंटात निर्माण करण्यात आलेल्या नंदनवनाबद्दलचे वार्तापत्र एका वृत्तपत्रात वाचायला मिळते. त्याची मूळ योजना चाळीस वर्षांपूर्वी भूगर्भशास्त्रज्ञ मोदेस्त अलेक्सांद्रेविचने मांडल्याचा उल्लेख त्यात असतो. हे नाव आपल्या वडिलांचे हे ॲनाच्या लक्षात येते व तिला आनंद वाटतो. त्या वृत्तपत्राचे ते पान ती वाचनालयातून हळूच फाडून घेते; पण तेवढ्यात तेथे एक पोलिस येतो. तो दंडाची धमकी देतो. पण तिच्या वडिलांबद्दलचीच बातमी त्यात आहे हे कळल्यावर तो तिला ते पान नेऊ देतो. ती त्या पोलिसाला वीस वेळा वाकून नमस्कार करते. पण त्या बातमीत तो तरुण भूगर्भशास्त्रज्ञ तरुणवयातच अकाली वारल्याचा उल्लेख असतो. वस्तुस्थिती अशी असते की तिच्या वडिलांना तब्बल वीस वर्षे रशियाच्या गुन्हेगार छावणीत काढावी लागलेली असतात. त्यानंतर त्यांची सुटका झालेली असते. पण त्यांना सरकारकडून कुठलीही मदत मिळत नाही. कारण त्यांची केस म्हणे कुठल्याच नियमात बसत नाही. किमान वर्षे नोकरी केल्यावर निवृत्ती वेतन मिळते. तिच्या वडिलांना निवृत्ती वेतनापासून वंचित राहावे लागते. स्टॅलिनच्या कारकीर्दीत काही बुद्धिमान, कल्पक पण स्वतंत्र विचारांच्या व्यक्तींची जी गळचेपी झाली तिची काहीशी कडवट चव या कथेच्या शेवटी चाखायला मिळते.

**'न्यायासाठी दाद मागण्याची जरूरी नसते. देव, निसर्ग हाच सर्वात मोठा न्यायाधीश. आज ना उद्या प्रत्येकाला आपल्या कृत्याचं भलंबुरं बक्षीस मिळतच असतं.'**

होशियार!!!

व्हॅलेंटिन रासपुतिन याच्या 'गुरुर्माता: गुरुमित्रा:' या कथेत एका सहृदय शिक्षिकेचे

व्यक्तिचित्र रेखाटले गेले आहे. घरापासून दूर राहणाऱ्या, अधूनमधून उपास काढणाऱ्या आणि जुगाराच्या नादाने लुबाडल्या जाणाऱ्या एका विद्यार्थ्याची ओढगस्त बघून त्याला घरी बोलावून खाऊपिऊ घालणाऱ्या शिक्षिकेची वत्सल माया... मदत घेण्यास नकार देणाऱ्या या विद्यार्थ्याला खेळात जिंकण्याची संधी देण्याचा तिचा प्रयत्न - त्याचा शाळेच्या प्रमुखांनी लावलेल्या विकृत व चुकीचा अर्थ आणि त्यातून तिच्या नोकरीवर आलेली गदा... या व्यवहारी जगात कोणाला निष्कपट भावाने मदत करणे हाही गुन्हा ठरतो!

होशियार ही कथा तेदो या विदूषकाच्या विविध उद्योगांच्या (लोकांची भरपूर करमणूक करणे, शवपेट्या तयार करणे) गमतीदार किश्श्यांनी रंजक होते. त्याच्यावर प्रेम करणाऱ्या पण तोंडाने फटकळ अशा बाबली या त्याच्या बायकोच्या तणावपूर्ण नातेसंबंधाचेही ती चित्रण करते. बाबलीच्या मृत्यूनंतर तेदो वेडापिसा होतो. वास्तवाचे त्याचे भान हरपत जाते. स्वत:साठी तो शवपेटी तयार करून घोड्यावर बसून गावात एकटा फिरू लागतो. आणि एके दिवशी त्याचा मृतदेह गावकऱ्यांना दिसतो.

**'मातृभूमीवर प्रेम करायचं असेल, तर प्रथम आपल्या आईवर प्रेम असायला हवं.माणूस आकाराला येतो तो आईच्या पुण्याईनं.आणि माणसामध्ये जे जे काही सर्वोत्तम आहे त्याचा उगम केवळ आईच्या प्रेमामध्ये आहे.'**

एकच चूक

दुकानदाराकडे विक्रेती म्हणून काम करणाऱ्या मरियाच्या हिशेबात एक हजार रुबल्सची तूट आल्याचे मुनीमजी सांगतो. हजार रुबल्सची भरपाई करण्यासाठी तिचा नवरा शेजाऱ्यापाजाऱ्यांना साकडे घालतो. त्या प्रयत्नात त्याला येणारे भलेबुरे अनुभव मानवी स्वभावाचे अनेक कंगोरे स्पष्ट करतात. व्हॅलेंटिन रासपुतिनने त्यांचे मार्मिक दर्शन 'कठीण समय येता' मध्ये घडवले आहे.

धरणात जाणाऱ्या गावाचे पुनर्वसन ही समस्या रशियातही डोकेदुखीचीच असल्याचे 'लय विलया गेली' या कथेवरून जाणवते. घर सोडून जाण्याबाबत आजोबांची जाणवणारी नाराजी, त्यांच्या दोन पदवीधर मुलांनी उच्च अधिकारपदे मिळवूनही त्यांनी केलेली उपेक्षा, नुकसान भरपाईची मिळणारी अपुरी रक्कम, नाइलाजाने गाव सोडून रेल्वे लाइनवर पहारेकरी म्हणून स्वीकारलेली नोकरी आणि त्याच्या मुलाने अधिकारी म्हणून त्यांना दिलेली ओळख, वडिलांची उपेक्षा केल्याची त्या मुलाला वाटणारी खंत – आणि स्वाभिमानी वडिलांनी मुलाकडे आश्रयाला जायला दिलेला नकार – हा सर्व अनुभव भारतीय मानसिकतेला परका वाटण्याचे कारण नाही. जुन्या पिढीचा कणखरपणा आणि शिकलेल्या उच्चपदस्थ मुलांना आपल्या खेडवळ पालकांबद्दल वाटणारा दुरावा - आपल्याकडच्याही अनेक लेखकांनी रंगवलेला आहे. देश-नावे-स्थळे भिन्न आहेत; पण माणसांच्या वृत्तिप्रवृत्ती सगळीकडे सारख्याच!

कथांची निवड आणि अनुवादाची शैली या दोन्ही दृष्टींना 'अंतरपर्व' वाचकांची दाद मिळवेल. नायकनायिका वा स्थळे यांची नावे अपरिचित असल्याने या कथा वेगळ्या



वाटतात एवढेच! एरव्ही त्यांच्या भाषेचा बाज असा आहे की मराठी मातीतल्याच आहेत असे वाटावे.

'दनियार पुन्हा गाऊ लागला. त्याचा आवाज हळूहळू खुलत गेला. बघता बघता सूर षड्जापर्यंत झेपावले. साऱ्या आसमंतात त्याचे सूर अवघे भरून राहिले होते. त्या हिंदोळ्यावर आम्ही डोलू लागलो. मी तर आकंठ आश्चर्यात बुडालो. दनियार एवढं सुंदर गाऊ शकतो? कोणी कधी विश्वासही ठेवला नव्हता की दनियार असं झाकलं माणिक आहे म्हणून. माझ्या हळूहळू त्याच्या घुमेपणाचा, एकलकोंडेपणाचा अर्थ ध्यानी येऊ लागला...'' (७३)

हवेत हलकासा गारठा होता. त्यात शरदाचं शुभ्र चांदणं ... आम्ही दृष्टिपथात येणारी एकेक चांदणी मोजत पुढं चाललो होतो. जमिल्या इकडे तिकडे पाहत काही गुणगुणत होती. हळूहळू मोत्याचा सर ओघळत जावा तसे तिच्या सुरेल गळ्यातून सूर ओघवते होत होते. (७२)

दुसऱ्या दिवशी ती सकाळी उशिराच उठली. कॅप्टन कामावर निघून गेला होता. आई रात्रपाळीहून अजून परतायची होती. उन्हं खूप चढली होती. ती अंथरुणात उठून बसली. लांबसडक वेण्यांचे शेपटे खांद्यावर रुळू लागले. तिने एक नजर या 'संपदे'वर टाकली. तिरीमिरीत उठून हातात कात्री घेतील आणि धारदार पात्यानं एकामागोमाग एक दोन्ही वेण्यांचा निकाल लावून टाकला. पायाशी पडलेल्या सोनेरी बटांकडे तिनं ढुंकूनही पाहिले नाही.'' (१०५)

**'सर्व माणसांकडे पाहण्याचा एकच सरधोपट दृष्टिकोन नको.कलावंताची घडण जरा वेगळ्या मातीतून होत असते.त्याला हाताळणारे हातही संवेदनक्षमच असायला हवेत'**

कळावंत

आम्ही ऐकता ऐकता दिङ्मूढ होऊन गेलो. वाटलं अवघ्या चराचराप्रमाणेच माणूस ही निसर्गाची, प्रभूची निर्मिती आहे. वरवर दिसायला साधीच. नुसत्या हाडामांसाची मूर्ती. पण एखादी वेळ अशी येऊन ठाकते की त्याला केवळ रंगरेखांचीच किनार असते असे नाही, तर त्या सुंदर लेण्याला साज असतो माणुसकीचा आणि त्याचा आत्मा असतो असाच निर्मळ, निर्व्याज आणि नि:स्सीम प्रेमाचा! (२६)

असे परिच्छेद वाचताना ते मूळ रशियन कथेमधले आहेत, वेगळ्या सांस्कृतिक संदर्भांनी युक्त आहेत असे क्षणमात्रही जाणवत नाही. हे सगळे इथल्या मातीशी, इथल्या मानसिकतेशी एकजीव झाल्यासारखेच वाटतात! या अनुवादाला म्हणूनच स्व-निर्मितीचे श्रेय लाभते.

**पृष्ठे : १५६ ● किंमत : १३० रु. ● सभासदांना : ९१ रु. ● पोस्टेज : २० रु.**




# हसता हसता आरोग्य

**डॉ. मदन कटारीया**
**दिगंबर गाडगीळ**

**तुम्हीही आपल्या परिसरात हास्य क्लब सुरू करू शकता**

हास्यक्लब, हसण्याचे महत्त्व, हास्याचे प्रकार, हास्यक्लबमधील कार्यक्रमांची आखणी याबद्दल सर्वांगीण माहिती देणारे 'हसता हसता आरोग्य' हे पुस्तक अत्यंत उद्‌बोधक आहे.

विशिष्ट वेळी ठरलेल्या ठिकाणी शे-दीडशे स्त्रीपुरुषांनी जमणे आणि तास-अर्धातास हसत राहणे यासाठी हास्य-क्लब, लाफ्टर क्लब आज जगभर सुरू झालेले आहेत आणि निरनिराळ्या देशात त्यांची संख्या तीन हजारावर गेलेली आहे. रोटरी क्लब, लायन्स क्लब यांच्याचप्रमाणे लाफ्टर क्लबची संकल्पना व चळवळ सर्वत्र सहजपणे स्वीकारली जात आहे आणि आपला प्रभाव दाखवत आहे. आश्चर्याची आणि अभिमानाची बाब म्हणजे रोटरी-लायन्सप्रमाणे या आद्य लाफ्टर क्लब चळवळीचा उदय परदेशात झालेला नसून, तो भारतात, मुंबईत झालेला आहे आणि लाफ्टर क्लब इंटरनॅशनल या अधिकृत नोंदणी झालेल्या संस्थेकडे नव्या हास्यक्लबांना एक हजार रुपये शुल्क भरून ॲफिलिएशन मिळवावे लागते. रोटरी-लायन्स क्लबना दरवर्षी प्रत्येक सदस्यागणिक काही डॉलर्स मूळ इंटरनॅशनल संस्थेला पाठवावे लागतात, त्याप्रमाणे लाफ्टर क्लब इंटरनॅशनलला इंग्लड-अमेरिका-जर्मनी-ऑस्ट्रेलिया वगैरे देशातील (तसेच भारतातीलही) लाफ्टर क्लब पासून नोंदणी शुल्क मिळते. मात्र ते वार्षिक नसते, नोंदणी करताना एकदाच घेतले जाते. १३ मार्च १९९५ रोजी पहिल्या हास्यक्लबचा मुंबईत डॉ. मदन कटारिया यांनी एका सार्वजनिक उद्यानात आरंभ केला. पहिल्या सहा वर्षात आठशेवर क्लब भारतात व अन्य देशात स्थापन झाले. आज त्यांची संख्या तीन हजारावर असेल. मे महिन्याचा पहिला रविवार हास्यदिन म्हणून साजरा केला जातो.

## नवा विश्वव्यापी धर्म

हास्याची देणगी लाभलेली मानव ही एकमेव प्रजाती आहे आणि माणूस हा काही गमतीदार बघितले की उत्स्फूर्तपणे हसत असतो. हास्य ही एक जागतिक भाषा आहे. भाषा-देश-वेष-संस्कृती यांचे भेद विसरायला लावून जगभरातील मानव समूहांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य हास्यामध्ये असते. हास्यक्लब ही हसण्यावारी नेण्याची गोष्ट नाही. तर ती जगाला एकसंध करण्याची क्षमता असलेला तो एक नवा विश्वव्यापी धर्म होऊ शकेल आणि उत्तम आरोग्य, मैत्री, बंधुभाव यांचा संदेश मानवाला देत राहील, अशीही अपेक्षा आहे.

लाफ्टर क्लब इंटरनॅशनलच्या ध्येयधोरणात या नव्या हास्यधर्माच्या आणि हास्ययोगाच्या निर्मितीचे प्रतिबिंब पडलेले आहे.

१. संवेदनशील आणि आनंदी जीवन जगण्यासाठी काय करावे लागेल. हे समजून घेऊन त्यासाठी हास्योपचाराच्या नव्या योगिक तंत्राबाबत जागृती निर्माण करणे, विविध हास्योपचारांचे प्रशिक्षण देणे.

२. वेगवेगळ्या उपचार पद्धतीतील तज्ज्ञ डॉक्टर्सकडून हास्योपचारातून शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक उत्थान कसे घडू शकते याविषयी संशोधन-निरीक्षण करून त्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध करणे.

३. निरनिराळ्या देशांतील लोकांना एकत्र आणून हास्याच्या माध्यमातून जगात चिरस्थायी शांतता निर्माण करणे.

४. पुस्तके, ग्रंथालये, व्हिडिओ-ऑडिओ कॅसेटस्, सीडीज वगैरे माध्यामांतून हास्योपचारांची माहिती सर्वदूर पोहचवणे.

**हास्यक्लबामध्ये हसायची तुमची तयारी हवी. हास्यक्लबाचे सदस्य हसतात त्यामागे स्वखुशीची आणि सामुहिकपणाची भावना असते.**

## अनेक व्याधी आटोक्यात येतात

हसण्यामुळे एकाग्रता क्षमता वाढते. आत्मविश्वास वाढतो. परस्परसंबंधात सुधारणा होते. सामाजिक अभिसरण वाढते. उत्साह वाढतो. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची सवय होते. रक्तप्रवाह सुधारतो. रोगप्रतिकारक शक्ती वाढून सर्दीपडसे, ॲलर्जी, सांधेदुखी, फुफ्फुस नलिकादाह यामध्ये लौकर आराम पडतो कर्करोगातही हास्य हे प्रतिबंधात्मक उपचारासारखे उपयुक्त ठरते. दहा मिनिटे हसल्याने स्पाँडिलायटिसच्या वेदनांपासून दोन तासांसाठी सुटका होऊ शकते. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार नियंत्रित होणे सुलभ जाते. हास्य हा सकारात्मक आणि आयुष्यवर्धक ताण असल्याचे डॉ. हॅन्स सेली यांनी स्पष्ट केले असून त्यामुळे ॲड्रेनलिन, नॉर ॲड्रनलिल तसेच कॅटेकोलअमाइन्स मुक्त होऊन रक्तप्रवाह सुधारतो, सूज कमी होते आणि शरीराला उत्तेजना मिळून जखमही लौकर भरून येते. जीवनातले लहानमोठे ताण नाहीसे होऊन दु:खाची तीव्रताही मंद होण्यास मदत होते.

## एरोबिक व्यायाम

हास्य हा एक उत्तम प्रकारचा एरोबिक व्यायाम आहे. त्याने श्वसन सुधारते, प्राणवायूचा अधिक पुरवठा होतो. चिंता काळजी कमी होते, खेळातील चापल्य सुधारते, दीर्घश्वसनाने मानसिक संतुलन साधते, सृनजशीलता वाढते. एकाकीपणा, एकलकोंडेपणा, माणूसघाणेपणा, तुसडेपणा कमी होऊन व्यक्तीची सामाजिक सामंजस्याची भावना परिपुष्ट होत जाते.

## विनोदबुद्धी आणि हास्यनिर्मिती

हास्यक्लबात हास्यनिर्मितीसाठी वेगवेगळे मार्ग व प्रकार वापरण्यात येतात. विनोदी किस्सा, गमतीदार प्रसंग वगैरे सांगून इतरांना हसवण्याचा मार्ग हा सर्वपरिचित आहे. विनोदी लेख वाचणे, विनोदी भाषण ऐकणे, व्यंगचित्र–विडंबन–विनोदी चित्रपट-नाटक बघणे यानेही हसू येते. परंतु, तेच विनोद आणि किस्से पुन:पुन्हा ऐकवण्यात आले तर हसू येत नाही असाही अनुभव आहे. आयुष्यात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनांकडे गमतीने बघता येणे म्हणजे विनोद बुद्धी. पण ही विनोदबुद्धी फारच थोड्या लोकांकडे उपजत असते. लहान मुलांमध्ये निर्हेतुक हसण्याची प्रवृत्ती दिसते, पण विनोदबुद्धी त्यांच्यात असते म्हणून ती प्रवृत्ती दिसते असे म्हणता येणार नाही. आनंदी राहणं ही त्याची प्रवृत्ती असते. म्हणून ती हसत असतात. पण मुले मोठी होतात, जबाबदारी-भय-असुरक्षितता यांचे दडपण वाढते तसे त्यांचे हास्य कमी कमी होत जाते. विनोदबुद्धी जोपासण्यासाठी आपल्या मनात निर्माण होणारे हे अवरोध दूर होण्याची गरज असते. विनोदाने ज्यांच्या चेहऱ्यावर सुरकुतीही उमटत नाही अशा माणसांना खळखळून हसायला लावणे, स्वत:हून विनोद सांगावासा वाटणे, दुसऱ्याच्या विनोदाला प्रतिसाद देणे, अवघडलेल्या व अडचणीच्या प्रसंगीही खेळकर वृत्ती टिकवून धरणे वगैरे गोष्टींसाठी अहेतुक, विनाकारण हसण्याची सवय जोपासावी लागते. विनोदाचा आसरा न घेताही आपल्याला हसता यायला हवं. समूहात असल्यावर एकजण हसला की दुसरा हसू लागतो, हसता हसता ताणतणाव दूर होतात. मन मोकळे होते, इतरांशी संवाद साधावासा वाटतो. हसण्याने विनोदबुद्धी निर्माण होते. हास्य आणि विनोद या दोहोंचा संगम होतो. उगाचच्या उगाच हसायला सुरुवात करा. विनोदबुद्धी आपोआप निर्माण होईल असे हास्यक्लबच्या प्रवर्तकांचे गृहीतकृत्य आहे आणि ते अनुभवाच्या कसोटीवर वास्तवही ठरले आहे.

**केवळ स्वतःच आनंदी होणं पुरेसं नाही, तर इतरांनाही आनंदी करणं हे हास्यक्लबाचं ध्येय असतं.हेच तर हास्याचं तत्वज्ञान आहे. सानुदायिक प्रयत्नातून हास्याचं तत्व सहज साध्य होतं.**

## हास्य हा एक योग

हसण्याची नक्कल केली आणि आनंदी असल्याचा अभिनय केला तरी शरीरात सुखदायी रसायनांची निर्मिती होते असे आढळून आले आहे. विनोदावर हसा किंवा जाणूनबुजून व्यायाम म्हणून हसा, तुमच्या शरीराला सारखाच फायदा होता असे न्यूरोलिंग्विस्टिक प्रोग्रॅमिंगचे तत्त्व आहे. हास्य क्लबात येतानाच आपल्याला हसायचे आहे ही मानसिक तयारी झालेली असते. त्याचबरोबर आपल्या बरोबरचे इतर लोक हसत असतात, त्यामुळेही आपला संकोच कमी होऊन आपल्यालाही त्या हास्यात सहभागी होता येते. समूहातल्या हसण्यामुळे मनातले हास्य-अवरोधक अडथळे शिथिल होतात. दिवसभरातले स्वाभाविक हसणे हे निमित्तानिमित्ताने होत असते. परंतु, हास्यक्लबातील योगिक हसण्यामुळे दिवसभर हसत राहण्याची क्षमता वाढते, असा अनुभव आहे. उगीचच्या उगीच हसणे ही कल्पना चमत्कारिक व विचित्र वाटते. हसण्याच्या क्रियेच्या आड बुजरेपणा, मानसिक अडथळा येतो. मोठ्या समूहात हसणे सोपे जाते, हेही लक्षात घेऊन हास्यक्लबमध्ये वेगवेगळ्या हास्यप्रकारांचा वापर केला जातो.

लाफ्टर इज द बेस्ट मेडिसिन असे नेहमी म्हटले जाते.

हास्याचा उपयोग रोगनिवारणासाठी होऊ शकतो. हास्याने शरीरातील वेगवेगळ्या स्नायूंवरील ताण कमी होतो. हास्य हा एक योग आहे. ध्यानधारणेसारखा प्रकार आहे असे समजून प्रयोग केले तर हास्याने विशिष्ट व्याधींची तीव्रता कमी होऊ शकते हेही प्रयोगांद्वारे सिद्ध झाले आहे.

तालबद्ध टाळ्यांनी हातावरच्या ॲक्युप्रेशर पॉइंटसना उत्तेजना मिळून प्रफुल्लतेची जाणीव होते.

हो हो – हाहाहा घोष केल्याने योगिक श्वसनपद्धतीला चालना मिळते. विविध योगमुद्रांवर आधारित हास्यप्रकारांनी शरीराचे संतुलन चांगले राहते. (सुखद हास्य, सिंहमुद्रा हास्य, मधुर हास्य इ.)

**हास्यक्लब आपल्या सदस्यांना भावनिक सुरीक्षततेचं कवच देतो. त्यामुळे सभासदांची रोगप्रतिकारशक्ती वाढते. कठीण प्रसंगात आपण एकटे असणार नाही असं त्यांना वाटतं.**

**एक मीटर हास्य, लस्सी हास्य, मोबाईल हास्य, झटका हास्य, जपानी बुजरं हास्य, तालबद्ध हास्य, नृत्य हास्य, नमस्ते हास्य, कौतुक हास्य वगैरे प्रकार लोकांचा बुजरेपणा घालवण्यासाठी वापरतात. आरंभी त्याद्वारे कृत्रिम हास्य करण्यास प्रेरित केले जात असले तरी सवयीने त्यात उत्स्फूर्तपणा येत जातो आणि व्यक्तीचा खेळकरपणा वाढत जातो.**

हास्याच्या या विविध प्रकारांच्या जोडीला दीर्घश्वसन, चालणे, चेहऱ्याच्या स्नायूंचे व्यायाम, डोळ्यांचे व्यायाम, मानेचे व्यायाम यांची जोड दिली तर निरोगी मनाबरोबर शरीरही सुदृढ होते. हसण्यामुले पांढऱ्या पेशींचे प्रमाण वाढते. एरोबिक व्यायामाप्रमाणेच हास्याने हृदयाला उत्तेजना मिळून रक्ताभिसरण वाढते. एक मिनिटभर हसणे हे दहा मिनिटे

नौकायंत्रावर व्यायाम करण्याबरोबरीचे असते असे स्टॅनफर्ड विद्यापीठातील डॉ. विल्यम फ्राय यांनी प्रयोगाद्वारे सिद्ध केले आहे.

हसण्यामुळे शरीरातील दु:खनिवारक तत्त्वांची – एंडॉरफिन्सची – पातळी वाढते, छातीमध्ये साठलेला कफ बाहेर पडतो, श्वासनलिकादाह कमी होतो, वायुनलिकातील चिकटस्राव बाहेर टाकण्याची नैसर्गिक यंत्रणा चांगले काम करू लागते. हास्यामुळे शरीरातील बहुतेक स्नायूंना व्यायाम मिळतो. आणि चेहरा आनंदी व आकर्षक होतो. काही हास्यप्रकारांमुळे पोटाच्या स्नायूंना मसाज होतो. पचनक्रिया सुधारते. अभिसरणयंत्रणा आणि श्वसनप्रणाली सुधारते. नॉर्मल कझिन यांनी 'ॲनाटमी ऑफ ॲन इलनेस' या पुस्तकात हास्यातून रोगहरण आणि मेंदूतील सुख केंद्राला मिळणारी उत्तेजना याकडे लक्ष वेधले आहे. डॉ. पॉल ऐकमन यांनी हास्याचे १८ प्रकार सांगून त्याद्वारे विशिष्ट अवयव कसे प्रभावित होतात त्यावर प्रकाश टाकला आहे.

**हास्यामुळे चिंता, तणाव, विमनस्कता,दूर होते.त्यामुळे वाढीव रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह नियंत्रित होण्यास मदत होते.थोडक्यात हास्ययोगात सामील होणाऱ्यांचं शारीरिक आणि मानसिक पातळीवरचं आरोग्य सुधारतं.**

हसण्यासाठी हास्यक्लबातच जायला हवे असे नाही. आपल्या घरी, कार्यालयात, कुठेही हसता येते. हास्यामुळे उत्पादकता वाढते, दैनंदिन ताणतणावांना अधिक सहजपणे तोंड देण्याची क्षमता वाढते. हास्योपचारामुळे वरिष्ठ-कनिष्ठ यांच्यातील सुसंवाद, परस्पर विश्वास, सामंजस्य वाढते. हास्योपचार हा ध्यानधारणेसारखाच प्रकार ठरतो. सामूहिक हास्याद्वारे अपराध, भय, असूया, क्रोध, अहंकार वगैरे विघातक प्रवृत्तींना अंकुश बसतो. क्षमाशीलता वाढते. सहिष्णुता वाढते.

'हसता हसता आरोग्य' या पुस्तकाने अशा माहितीचे भांडारच खुले केले आहे. या पुस्तकातील हास्यक्लब आणि हास्य यांच्याबद्दलची माहिती वाचून आणि हास्यामुळे शरीरस्वास्थ्य सुधारते हे लक्षात घेऊन आपल्यालाही त्याविषयी आस्था वाटू लागली असेल. आपल्या परिसरातही तीसचाळीस मित्र मिळवून एखादा हास्यक्लब का सुरू करू नये – असा विचार तुमच्या मनात आला असेल, तर खालील पत्त्यावर संपर्क साधा. तुम्हाला संस्थेचे प्रतिनिधी येऊन मार्गदर्शन करतील. वेगवेगळ्या व्यायामप्रकारांची माहिती देतील. कार्यपद्धतीची कल्पना देतील.

पत्ता - डॉ. मदन कटारिया, लाफ्टर क्लब इंटरनॅशनल, ए-१, डेनझिल, तिसरा क्रॉस रोड, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी पश्चिम, मुंबई - ५३.

फोन २६३१६४२६, २६३२४२९३.

laugh@vsnl.com. www.laughteryoga.com

**पृष्ठे : ११६ ● किंमत : ९० रु. ● सभासदांना : ६३ रु. ● पोस्टेज : २० रु.**






### * 'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद : खुली निबंध स्पर्धा व ग्रंथ-पुरस्कार निकाल'

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेतर्फे दरवर्षी **'संतांचे विचारधन व सामाजिक कार्य'**या व्यापक विषयाच्या अनुषंगाने 'कै. विश्वनाथ विनायक ओक स्मृती' खुली निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. यंदा **'राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज : विचार व कार्य'** या विषयावर ही स्पर्धा घेतली गेली. प्रस्तुत स्पर्धेतील

* **प्रथम क्रमांकाचे पारितोषिक** (रु.४००) परभणीचे श्री. संजय गरुड यांना,

* **विशेष पारितोषिक** (रु.४००) सातत्याने गेली चार वर्षे उत्कृष्ट निबंधलेखन केल्याबद्दल बीडच्या श्रीमती कमलिनी बोकरिया यांना देण्यात आले.

परीक्षणाचे काम प्रा. डॉ. माधुरी पणशीकर, मुंबई आणि डॉ. तेज निवळीकर, पुणे यांनी पाहिले.

कोल्हापूर येथील 'गोयंका फाऊंडेशन'च्या सहकार्याने दरवर्षी तत्त्वज्ञान/तर्कशास्त्र/धर्मचिंतन या विषयावरील उत्कृष्ट ग्रंथास पुरस्कार दिला जातो.

* **प्रथम क्रमांकाचा पुरस्कार** (रु.३००१) नागपूर येथील श्री. आनंद तांबे यांना 'प्रतीत्य समुत्पादाचे अवमूल्यन' या ग्रंथासाठी, देण्यात आला.

* **द्वितीय पुरस्कार व पारितोषिक** (रु.२००१) नाशिक येथील श्री. विश्वास साक्रीकर यांना **'शोध कुंभपर्वाचा'** या ग्रंथासाठी मिळालेला आहे. ग्रंथ परीक्षणाचे काम नागपूर येथील डॉ. सुनीती देव आणि डॉ. वृषाली कुलकर्णी यांनी पाहिले.

हे दोन्ही उपक्रम मुंबईचे ओक कुटुंबीय आणि कोल्हापूरचे श्री. माधवप्रसादजी गोयंका या तत्त्वज्ञानप्रेमी, दानशूर मंडळींच्या सहकार्यामुळेच शक्य झाले.

### * 'जोहड'ला मृत्युंजयकार शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार

आजरा या गावचे सुपुत्र व 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांच्या स्मरणार्थ श्रीमंत गंगाताई वाचन मंदिर आजरा या संस्थेच्या ट्रस्टने यंदापासून पुरस्कार सुरू केला आहे.

प्रथम वर्षाच्या पुरस्काराचा मान सौ. सुरेखा शहा यांच्या 'जोहड' या कादंबरीला मिळाला आहे. दि. २५ सप्टेंबर रोजी हा पुरस्कार सौ. सुरेखा शहा यांना डॉ. रवींद्र ठाकूर (मराठी विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यांप्रसंगी प्राचार्य देशपांडे, सुभाष विभुते, डॉ. शिवशंकर उपासे, पांडुरंग बीडकर, वसंतराव गायकवाड, तोडकर, प्रा. दिलीप भालेराव आणि साहित्यप्रेमी नागरिक, उपस्थित होते.

## * 'दि लाइन ऑफ ब्यूटी'ला यंदाचे 'बुकर' पारितोषिक

मार्गारेट थॅचर यांच्या काळाचे चित्रण करणाऱ्या ॲलन होलिंगरस्ट यांच्या 'दि लाइन ऑफ ब्युटी' या कादंबरीला साहित्यक्षेत्रातील प्रतिष्ठेचे यंदाचे 'बुकर' पारितोषिक जाहीर झाले आहे. अमली पदार्थ, सत्ता आणि पैशाच्या राजकारणात गोंधळून गेलेल्या एका तरुणाचे या कादंबरीत चित्रण करण्यात आले आहे. पन्नास हजार पौंडांचे (नव्वद हजार डॉलर) हे पारतोषिक आहे.

'दि लाइन ऑफ ब्युटी' मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाचा पदवीधर निक गेस्ट या तरुणाची कहाणी असून, तिचा कालखंड १९८० चा आहे.

## * शिवाजीराव मोहिते यांना पीएच. डी.

दापोडी येथील सी. के. गोयल महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव निवृत्ती मोहिते यांना पुणे विद्यापीठाने मराठी विषयातील पीएच.डी. जाहीर केली आहे. 'संत नामदेव परिवाराची कविता : एक अभ्यास' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. नामदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ. अशोक कामत यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

## * सुषमा देवधर यांना इंदिरा सद्भावना पुरस्कार

दिल्लीच्या 'नॅशनल इंटिग्रेशन ॲण्ड इकॉनॉमिक कौन्सिल'तर्फे दिला जाणारा यंदाचा इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार विलेपार्ले येथील 'देवधर असोसिएट्स'च्या वास्तुविशारद सुषमा देवधर यांना इंदिरा गांधी यांच्या जन्मदिनी, हैदराबाद येथे दिला गेला. ज्येष्ठ समाजसेवक दिवंगत मधुकरराव महाजन यांची कन्या सुषमा देवधर यांना घरातच समाजसेवेचे बाळकडू मिळाले. मुंबईत म्हाडा, एमएमआरडीए या सरकारी भूविकास संस्थांबरोबरच खासगी विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या सुमारे ५५ हजार झोपड्यांच्या पुनर्वसन प्रकल्पासाठी वास्तुविशारद म्हणून त्या काम पाहत आहेत; तसेच अनेक सरकारी निमसरकारी संस्थांच्या वास्तुविशारद म्हणूनही त्या कार्यरत आहेत. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' या संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या त्या १९८२ पासून सदस्या आहेत.

## * डॉ. यु. म. पठाण यांचा सत्कार

केंद्र सरकारने 'बहुभाषाविद राष्ट्रीय पंडित' म्हणून सन्मानित केलेले; संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. यु. म. पठाण यांचा पुणे विद्यापीठाचे संत नामदेव अध्यासन आणि 'गुरुकुल प्रतिष्ठान'तर्फे सत्कार करण्यात आला पुण्यातील अनेक नामांकित संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या हस्ते डॉ. पठाण यांचा गौरव मानपत्र, शाल व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

'जातीधर्मनिरपेक्ष संशोधक आणि अखंड अध्ययनशील शिक्षक,' अशा शब्दांत पठाण यांचे वर्णन श्यामा घोणसे यांनी केले. तर, पठाण यांच्या लेखनात कधीही कोणताही अभिनिवेश आला नाही. त्यांची वृत्ती नेहमीच समन्वयवादी राहिली, असे प्रा. सतीश बडवे म्हणाले. डॉ. पठाण हे अभ्यासक आणि आदर्श शिक्षक आहेत असे सांगून डॉ. गोखले म्हणाले की, ''महाराष्ट्राचे हे चालते बोलते संतपीठ आहे. ज्याच्या केवळ असण्याने शिष्याला ज्ञानप्राप्ती होते, तो खरा गुरू, ही गुरूची व्याख्या पठाण यांना लागू होते.''

सत्काराला उत्तर देताना पठाण यांनी जीवनाविषयीची सार्थकता व्यक्त केली. मी सुखी माणसाचा सदरा घातलेला माणूस आहे. ज्या ज्या कामांकरिता आयुष्य वाहिले; त्याची फलश्रुती याच आयुष्यात पाहायला मिळाली, असे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या मराठी मातीने आणि पुण्याने मला मोठे केले. जीवनात अनेक क्षेत्रं मी धांडोळत गेलो . पण कधीच एकारलो नाही. जे काम, जे संशोधन आवडले ते केले. जी कामे हाती घेतली ती पूर्ण झाल्याचे पाहण्याचे भाग्य मला लाभले. मला समाजाने भरभरून दिले. माझ्या ओंजळीत मावणार नाही, एवढे समाजाने मला दिले, असेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, मराठी माणसाच्या मनात एकात्मता आहेच, तशी ती त्याच्या रक्तातही आहे. आपण सगळे एकसंधच आहोत. म्हणून आपण एकमेकांना समजून घेऊ. प्रत्येकाने प्रत्येक धर्म समजून घेतला म्हणजे आपला धर्माविषयीचा आदर वाढेल आणि परस्परांच्या सामंजस्यातून सध्याच्या समस्या संपतील. आपण एक झालो, तर भारत खरोखरच एक जागतिक शक्ती बनेल. हा विचार न मानणारे भरकटलेले आहेत. त्यांनाही आपण समजावले पाहिजे. नाही तर त्यांना बाजूला टाकले पाहिजे.

## * पुणे मराठी ग्रंथालयाचे पुरस्कार

''जंगलातील एकान्त वास्तव्यात वेड लागू नये, यासाठी पुस्तके वाचू लागलो आणि अक्षरांच्या नादाने लिहू लागलो,'' अशी आपल्या लेखकपणाची गोष्ट मारुती चितमपल्ली यांनी पुणे येथे कथन केली.

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे श्री. चित्तमपल्ली, माधवी देसाई आणि विजय देवधर या साहित्यिकांचा आणि अमरावती सार्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्ष श्रीकांत अनगळ यांचा सत्कार करण्यात आला. राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष रा. रं. बोराडे अध्यक्षस्थानी होते.

श्री. चितमपल्ली म्हणाले, ''झाडांच्या सहवासात राहणारा झाडांपेक्षा उंच होतो. ग्रंथांच्या सहवासात राहणाराही ग्रंथांपेक्षा मोठा होतो. जंगलात एकटा वावरताना दृष्टिभ्रम होत असे. त्यामुळे वेड लागू नये, यासाठी पुस्तके वाचायला लागलो. 'वनवासा'त वेद-उपनिषदे वाचली. त्यातून वन, पक्षी, प्राणी यांचे उल्लेख टिपून ठेवले.''

माधवी देसाई म्हणाल्या,''मला गायिका व्हायचे होते, पण होता आले नाही. लेखिका व्हायचे ठरवले नव्हते, तरीही लेखिका झाले. जीवन नावाच्या महान ग्रंथाच्या प्रत्येक पानापानावर माणसे अनुभवत गेले, त्याचीच पुस्तके झाली.''

नव्या साहित्यिकांना मंच दिला पाहिजे, असे श्री. बोराडे यांनी सांगितले. साहित्याच्या गुणात्मक वाढीइतकेच वाङ्मयाला जास्तीत जास्त वाचक मिळवून देणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकप्रिय साहित्याला दूर ठेवता कामा नये, असेही त्यांनी सांगितले.

## * डॉ. महाजन यांना 'रंगनाथन-कौला पुरस्कार'

ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रात केलेल्या विशेष कामगिरीबद्दल जयकर ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल डॉ. शां. ग. महाजन यांना 'रंगनाथन-कौला पुरस्कार- २००२' प्रदान

करण्यात आला. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. महाजन यांनी लिहिलेल्या 'हिमालयातील चारी धाम यात्रा' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे व 'ए टेक्स्टबुक ऑफ लायब्ररी सायन्स' या पुस्तकाचे प्रकाशन; तसेच 'दिनविशेष' व 'ज्ञानगंगा घरोघरी' या पुस्तकांच्या मुद्रणप्रतींचे सादरीकरण या वेळी करण्यात आले. आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. इनामदार, 'डॉ. कौला एन्डोमेंट फॉर लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्स' या संस्थेचे चिटणीस डॉ. वेंकटप्पया, 'पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान'च्या व्यवस्थापकीय विश्वस्त भाग्यश्री भिडे आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. भिडे म्हणाले,''वाचकांची आवड, गरज लक्षात घेऊन डॉ. महाजन यांनी वाचनालयात पुस्तके उपलब्ध करून दिली. अनेक विषयांवर चिंतन करून पुस्तके लिहिली.''

''आपल्यातील सुप्त गुणांचा पूर्णत्वाने विकास करून समाजोपयोगी काम करा, या डॉ. रंगनाथन यांनी केलेल्या उपदेशानुसार मी माझे सारे आयुष्य ग्रंथालयासाठी जगलो,'' अशी भावना डॉ. महाजन यांनी व्यक्त केली.

### * पुणे मराठी ग्रंथालयास 'उत्कृष्ट ग्रंथालय' पुरस्कार

राजा राममोहन रॉय पुस्तकालय प्रतिष्ठानतर्फे (कोलकाता) विभागवार देण्यात येणारा 'उत्कृष्ट ग्रंथालय' पुरस्कार यंदा पश्चिम विभागातून पुणे मराठी ग्रंथालयास जाहीर झाला आहे. पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तिरुअनंतपुरमला नोव्हेंबर अखेरीस पुरस्कार वितरण होणार आहे.

### * बबन पोतदार यांना गुणगौरव पुरस्कार

गुंफण अकादमी (मसूर, जि. सातारा) यांच्यातर्फे देण्यात येणारा गुणगौरव पुरस्कार ग्रामीण कथालेखक व प्राप्तिकर खात्याचे जनसंपर्क अधिकारी बबन पोतदार यांना जाहीर झाला आहे. साहित्यक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा गौरव असल्याची घोषणा अकादमीचे अध्यक्ष प्रमोद चेणणे यांनी केली. श्री. पोतदार यांचे 'आक्रित' आणि 'गुंजेचा पाला' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

### * प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांना विष्णुदास भावे पुरस्कार जाहीर

'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्री प्रयोगाचा विक्रम करणारे प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांना या वर्षीचा विष्णुदास भावे गौरव पुरस्कार देण्यात आला.

पाच हजार रुपये रोख, भावे गौरवपदक व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कऱ्हाड येथील नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष शं. ना. नवरे यांच्या ५ नोव्हेंबरला रंगभूमीदिनी पुरस्कार प्रदान केला गेला

### * मराठी पत्रकारिता वाङ्मयापासून दूर जात आहे

मराठी भाषेची पत्रकारिता वाङ्मयापासून दूर गेल्याची खंत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी पुणे येथे व्यक्त केली.

साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुण्यतिथीनिमित्त केसरी-मराठा संस्थेने आयोजिलेल्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांना 'रंगात रंगलो मी' ग्रंथासाठी 'केळकर ग्रंथोत्तेजक पारितोषिक'; तसेच धुळे येथील स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन (सा) या संस्थेस डॉ. रा. वि. वारदेकर पारितोषिक या वेळी प्रदान करण्यात आले.

प्रा. जाधव म्हणाले, ''साहित्य आणि साहित्यिक कधीही कालबाह्य होत नाहीत. वाङ्मय हे बासनात गुंडाळून ठेवण्यासाठी नाही. मात्र, आजच्या पत्रकारितेत साहित्याचे प्रतिबिंब पुरेसे दिसत नाही. त्यामुळे पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी मराठी वाङ्मयाचा अभ्यास करायला हवा.''

चिंतामणराव आणि चित्तरंजन कोल्हटकर पितापुत्रांचे आत्मकथन मराठी वाङ्मयाचा ठेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वप्नील पोरे यांनी सूत्रसंचालन केले. अंजली आठवले यांनी आभार मानले

### * 'नवनीत' पुरस्कार

''शिक्षकांना वर्गात शिकवण्याचेच काम द्यायला हवे. त्यांच्याकडे इतर कोणतीही कामे देणे योग्य नाही. मतदार यादी घेऊन शिक्षकांना रानोमाळ फिरवता कामा नये,'' अशी अपेक्षा ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी पुणे येथे व्यक्त केली.

राज्य व राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांचा नवनीत पब्लिकेशन्सतर्फे 'नवनीत सन्मान'पुरस्कार देऊन सत्कार करताना प्राचार्य भोसले बोलत होते. ते म्हणाले, ''दशदिशांत प्राणवायूप्रमाणे भरून राहिलेल्या ज्ञानावर जग चालते. शिक्षकांनी माणूस घडविण्याचे, त्याला पूर्णत्व मिळवून देण्याचे कार्य केले पाहिजे. सध्या कावरेबावरे शिक्षक संस्थाचालकांचे वाढदिवस साजरे करण्यात दंग असतात. शिक्षकांचा स्वाभिमान जागृत करण्याची गरज आहे. विषयात तल्लीन होऊन शिकविणारे शिक्षक आयुष्यभरासाठी संजीवक देत असतात.''

### * 'तुका म्हणे साहित्य पुरस्कार'

बुलढाणा येथील 'तुका म्हणे' अनियतकालिक व महाराष्ट्र अनुवाद परिषद यांच्या 'तुका म्हणे साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून त्यामध्ये पुण्यातील तीन प्रकाशन संस्थांचा समावेश आहे.

कवितासंग्रह प्रकारात उन्मेष प्रकाशन आश्लेषा महाजन यांच्या स्वसंवेद्य या कवितासंग्रहास, वैचारिक प्रकारात श्री स्वामी पब्लिकेशन्स राजेश राजोरे यांच्या पत्रकारितेतील वास्तव तसेच समीक्षा प्रकारात सुविधा डॉ. चिंतामण कांबळे यांच्या अस्मितादर्श, साहित्य आणि संस्कृती यांना देण्यात आले.

१ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४ या कालावधीमध्ये प्रकाशित झालेल्या विविध साहित्य प्रकारातील प्रवेशिका पुरस्कारासाठी मागविण्यात आल्या होत्या. तीनशे पन्नास आली होती. परीक्षक एकनाथ धांडे व सुहास उगले होते. इतर पुरस्कार पुढीलप्रमाणे –**कवितासंग्रह** : १) शक्तिपाताचे सूत्र : मंगेश नारायण काळे (जळगाव), लोकवाङ्मयगृह, मुंबई, २) सारस्व : गोविंद कुळकर्णी (नांदेड) प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद. ३) भवताल : विलास कुवळेकर (रत्नागिरी) स्पंदन प्रकाशन, लांजा, रत्नागिरी, ४) विळखा : साहेबराव मोरे (मलकापूर) अमृत प्रकाशन, जळगाव, ५) सत्य आणि तर कविता : पुष्कराज चित्ते

(बुलढाणा) संवादिनी फीचर्स, नागपूर, ६) व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही (साखरखेडा) मुक्तछंद प्रकाशन, नागपूर.

**अनुवादित कवितासंग्रह** : १) काव्यपर्व : निरंजन उजगरे (ठाणे) मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २) ऐलान : डॉ. सुनील सावंत (मुंबई) वंदना प्रकाशन, मुंबई.

**अनुवादित कथा / कादंबरी** : १) मुक्तध्रुवा : डॉ. शारदा तुंगारे (नांदेड) शब्ददान प्रकाशन, नांदेड, २) मानवी दशावताराचा खेळ : मूळ लेखक पन्नालाल पटेल, अनुवाद - डॉ. सुषमा करोगल (बडोदे) साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

**वैचारिक** : विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य : डॉ. अशोक चोपडे (वर्धा) कॅन्डीड प्रकाशन वर्धा, अभिव्यक्तीची क्षितिजे : नरेंद्र लांजेवार (बुलढाणा) कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद.

**संपादित** : युगंधर नेते यशवंतराव चव्हाण : संपा. डॉ. बा. ह. कल्याणकर, आकांक्षा प्रकाशन, नागपूर.

**कथा-काव्य** : गाऊ जिजाऊस आम्ही : प्रा. इंद्रजित भालेराव (परभणी) प्रतिभास प्रकाशन, परभणी.

**समीक्षा** : १) जनसाहित्य चिंतन आणि चिकित्सा : डॉ. नीळकंठ गोपाळ मेंढे (वरुड) मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, २) मुस्लिम मराठी साहित्य, परंपरा व स्वरूप : डॉ. फ. म. शहाजिंदे (उस्मानाबाद) भूमी प्रकाशन, लातूर.

तुका म्हणे साहित्य पुरस्काराचे हे चवथे वर्ष असून स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. फेब्रुवारी २००५ मध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

### * श्रीराम लागू, अलका मांडके यांना रा. ना. पवार पुरस्कार

सोलापूर येथील रा. ना. पवार प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट साहित्य पुरस्कारासाठी यंदा डॉ. श्रीराम लागू यांच्या ‘लमाण’ या आत्मकथनाची आणि डॉ. अलका मांडके यांनी लिहिलेल्या डॉ. नीतू मांडके यांच्या ‘हृदयस्थ’ या चरित्राची निवड करण्यात आल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष माधव पवार यांनी सांगितले.

या पुरस्काराते वितरण साहित्यिक रवींद्र पिंगे यांच्या हस्ते २८ नोव्हेंबर रोजी झाले. पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे. या निमित्ताने श्रीराम पुजारी यांनी या प्रतिष्ठानला २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

यापूर्वी हा पुरस्कार उत्तम कोळगावकर (तळपाणी), हेमकिरण पत्की (एकांत वाटेने), सुरेखा शहा (जोहड), राजेंद्र दास (शब्द भेटण्याच्या वयातच), यशवंतराव गडाख (अर्धविराम), दासू वैद्य (तूर्तास) या पुस्तकांना देण्यात आला आहे. शरदकुमार एकबोटे, सुहास पुजारी आणि रजनीश जोशी हे परीक्षक होते. सुशीलकुमार शिंदे, विवेक घळसासी, जगदीश खेबुडकर, फ. मुं. शिंदे, डॉ. निर्मलकुमार फडकुले उपस्थित होते.

### * बालकुमार साहित्य संमेलनाचे पुरस्कार

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेतर्फे सन २००३ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांना विविध पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. प्रा. सुहासिनी देशपांडे यांच्या ‘कहाणी दोन भावांची’ या पुस्तकास कादंबरिका पुरस्कार, डॉ. लीला दीक्षित यांच्या पोपटाचे झाड यास दयार्णव कोपर्डेकर किशोर कथा पुरस्कार, डॉ. संगीता बर्वे यांच्या आदितीची साहसी सफर यास अनुवाद पुरस्कार मिळाले आहेत.

संस्थेतर्फे जाहीर झालेले अन्य पुरस्कार पुढीलप्रमाणे - दत्ता टोळ, वाचाल तर वाचाल (सीताबाई भागवत समीक्षा पुरस्कार), विजया जहागिरदार एकदा काय झालं (वा. गो. आपटे कथा पुरस्कार), गिरिजा कीर, नाटकाचं नाटक (शेवडे गुरुजी एकांकिका पुरस्कार), दीपा जोशी, या जनुकामध्ये दडलंय काय? (श्री. बा. रानडे विज्ञान पुरस्कार), प्रतिमा जोशी, कल्पना चावला (रा. गो. देसाई चरित्र पुरस्कार), कविता कुलकर्णी, सांगु का आई (कारले गुरुजी प्रथम प्रकाशन पुरस्कार), घन:श्याम देशमुख लुकलुकत्या चांदण्या (सर्जेराव जगताप सजावट पुरस्कार), सुरेश एजन्सी उत्कृष्ट प्रकाशन आणि लीला शिंदे पंख येती पक्ष्याला (सुलोचना नातू पुरस्कार).

या पुरस्कारासाठी परीक्षक म्हणून शंकर सारडा, पु. ग. वैद्य, डॉ. अश्विनी धोंगडे, शि. द. फडणीस, डॉ. हेमा सिधये व शकुंतला फडणीस यांनी काम पाहिले.

### * डॉ. मिलिंद बोकील यांना वासंती मुझुमदार पुरस्कार

दिवंगत कवयित्री व चित्रकार वासंती मुझुमदार यांच्या स्मृतीनिमित्त या वर्षीपासून साहित्यिकांना पुरस्कार देण्यात येणार असून पहिला पुरस्कार नामवंत कथालेखक डॉ. मिलिंद बोकील यांना प्राप्त झाला आहे. मानचिन्ह आणि १० हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मुझुमदार यांच्या निधनास सात नोव्हेंबर रोजी एक वर्ष पूर्ण झाले. मुझुमदार या ललितलेखिका आणि चित्रकार होत्या. कास्प या सामाजिक संस्थेतही त्यांनी मोलाचे कार्य केले होते. त्यांच्या कामाची आठवण रहावी आणि साहित्यिकांना सन्मान द्यावा, यासाठी हे पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत.

### * साहित्य अकादमी - ५०

प्रसिद्ध दलित कवी नामदेव ढसाळ यांना साहित्य अकादमीच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात, पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले. अडीच लाख रु. आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा सन्मान प्राप्त करणारे ढसाळ हे पहिलेच साहित्यिक आहेत. ढसाळांव्यतिरिक्त ६ मान्यवर लेखकांना अकादमीची ‘रत्न सदस्यता’ बहाल करण्यात आली तसेच विविध भाषांतल्या ९ साहित्यिकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. त्यात महाराष्ट्रातले ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर यांचाही समावेश आहे.

अकादमीच्या कार्याचा गौरव करताना पंतप्रधान म्हणाले : विविध भाषांतल्या उत्तमोत्तम साहित्यकृती अनेक भाषांमध्ये पोहोचवण्याचे महान काम गेल्या ५० वर्षांत अकादमीने केले. आता सारे जग जवळ येत असताना, भविष्याचा वेध घेत भारतीय साहित्य जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचवण्याचे काम अकादमीच्या हातून व्हावे. प्रचंड विविधता असलेल्या या महान देशाचे अखंडत्व केवळ लेखक आणि कवींनी निर्माण केलेल्या साहित्यकृतींमुळेच टिकले.

गेल्या दोन वर्षांत, संगीत नाटक अकादमी, ललित कला अकादमी आणि साहित्य अकादमीयांचे सुवर्णमहोत्सवी वर्ष पाठोपाठ सुरू झाल्याने, देशाचा सांस्कृतिक माहोल उजळला असून, देशात अनेक सांस्कृतिक चळवळींचा या निमित्ताने विकास होईल, असे माहिती, प्रसारण आणि संस्कृती मंत्री जयपाल रेड्डी म्हणाले.

पंतप्रधानांच्या हस्ते ज्या सहा साहित्यिकांना अकादमीची 'रत्न सदस्यता' बहाल करण्यात आली, त्यामध्ये भारतीय साहित्य रशियन भाषेत पोहोचवणारे प्रसिद्ध लेखक इ. व्हि. चेलिशेव, विख्यात लेखिका अमृता प्रीतम, कन्नड साहित्यिक यु. आर. अनंतमूर्ती, राजस्थानी साहित्यिक विजयदान देठा, बंगाली साहित्यिक शंख घोष आणि तेलुगु साहित्यिक बी. एच. कृष्णमूर्तींचा समावेश आहे. अमृता प्रीतम हा सन्मान स्वीकारायला उपस्थित नव्हत्या. त्यांच्या नातीकडे हा सन्मान पंतप्रधानांनी सुपूर्द केला.

विविध भाषांतल्या ज्येष्ठ साहित्यिकांचाही विशेष गौरव पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी अकादमीने केला. यापैकी ९ प्रत्यक्ष उपस्थित होते. यामध्ये महाराष्ट्रातल्या विंदा करंदीकरांसह श्रीमती कुरुतुलऐन हैदर, कृष्णा सोबती, विद्यानिवास मिश्र, डी. जयकांतन, एन. खेलचंद्र सिंह, गुंटुरू शेषेंद्र शर्मा, नीलमणी फुकन आणि गोविंदचंद्र पांडे यांचा समावेश होता. राजा राव, रहमान राही, रामनाथ शास्त्री आणि राजेंद्र शहा विविध कारणांनी सोहळ्याला उपस्थित राहू शकले नाहीत. बहुतांश साहित्यिक वृद्धत्वाकडे झुकलेले असल्याने इतरांचा आधार घेत कसेबसे व्यासपीठापर्यंत पोहोचत होते. श्रीमती हैदर व्यासपीठावरच होत्या, मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना जागेवरून उठताच येईना, तेव्हा पंतप्रधान स्वत: त्यांच्या आसनाजवळ गेले आणि त्यांना सन्मान प्रदान केला.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रथमच तरुण लेखकांना विशेष पुरस्कार देण्याची प्रथा सुरू झाली. या पुरस्कारांच्या मानकऱ्यामध्ये तरुण कथाकाल नीलाक्षी सिंह, कन्नड लेखक अब्दुल रशिद, बंगाली कवयित्री मंदाक्रांता सेन, इंग्रजी साहित्यकार रणजित होस्कोटे अन् मल्याळम् लेखिका एस. सितारा यांचा समावेश आहे.

सुरुवातीला साहित्य अकादमीचे अध्यक्ष गोपीचंद नारंग यांनी स्वागतपर भाषण केले, महासचिव सच्चिदानंद यांनी आभारप्रदर्शन केले. अकादमीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विख्यात दिग्दर्शक गुलजार यांनी तयार केलेला लघुपट दाखवण्यात आला.

*** ऑस्ट्रियाच्या जेलिनेक यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार**

स्त्री-पुरुषांतील भावनिक संघर्षाचे वेधक चित्रण करणाऱ्या ऑस्ट्रियाच्या कादंबरीकार व नाटककार एल्फ्रिड जेलिनेक यांना यंदाचे साहित्याचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. या पारितोषिकासाठी १९९६ नंतर प्रथमच महिलेची निवड झाली आहे.

जेलिनेक यांच्या कादंबऱ्यातील आणि नाटकांतील पात्रे केवळ संवाद म्हणत नाहीत, तर त्यांच्या संभाषणांतून समाजातील सत्तासंघर्षाचेही दर्शन घडते, असा गौरव पारितोषिक देणाऱ्या स्वीडिश अ‍ॅकेडमीने केला आहे.

१९४६ मध्ये जन्मलेल्या जेलिनेक यांचे लिखाण विद्यार्थी चळवळीशी संबंध आल्यानंतर अधिक टीकात्मक होत गेले.



*** प्रकाशक संघाचे पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे दिले जाणारे ललित साहित्यासाठीचे उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीचे पहिले पारितोषिक लेखक विजय पाडळकर यांच्या 'नाव आहे चाललेली' या पुस्तकाला जाहीर झाले आहे.

याच वाङ्मय प्रकारातील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार विंदा करंदीकर यांच्या 'अष्टदर्शने' या ललित साहित्याला मिळाला आहे.

वाचकांना पुस्तकाकडे आकर्षित करण्यासाठी पुस्तक निर्मितीत सौंदर्यदृष्टी यावी, छपाई वाचनसुलभ व्हावी, याबद्दल प्रकाशकांनी घेतलेल्या परिश्रमांची योग्य दखल घेतली जावी या उद्देशाने संस्थेतर्फे गेल्या वर्षीपासून हे पुरस्कार दिले जातात.

विविध वाङ्मय प्रकारांसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये ललितेतर प्रकारात श्रीराम लागू यांच्या 'लमाण'ला प्रथम व अरुण टिकेकर यांच्या 'स्थलकाल'ला द्वितीय क्रमांक मिळाला आहे. संदर्भ ग्रंथामध्ये सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर यांनी संपादित केलेल्या 'यांनी घडवलं सहस्त्रक' या पुस्तकाला पुरस्कार जाहीर झाला आहे.

माहितीपर साहित्यात लेखक अतुल धामणकर यांच्या 'वाघ' या पुस्तकाला प्रथम पारितोषिक तर विज्ञानविषयक पुस्तकात 'नेगल (२)' या विलास मनोहर यांच्या तर शिशु साहित्यात 'टमू ठमू ढमू' या अनंत भावे यांच्या पुस्तकाला प्रथम क्रमांक मिळला आहे.

लीला शिंदे यांच्या 'पंख येती पक्ष्योला' या पुस्तकाला बालसाहित्याचा तर श्रीनिवास पंडित यांच्या शूर गांडूळ या पुस्तकाला कुमार साहित्याचा पुरस्कार मिळाला आहे.

प्रौढ वाङ्मयाच्या मुखपृष्ठासाठी 'लमाण' व 'आल्फ्रेड हिचकॉक' या पुस्तकाची तर बालवाङ्मयासाठी 'पंख येती पक्ष्याला' या पुस्तकांची निवड करण्यात आली.

बोधचित्रांसाठी 'पंख येती पक्ष्याला' व 'गंगेमध्ये गगन वितळले' या पुस्तकांना तर जाहिरातीचे साहित्य प्रकारात मराठी वाङ्मयकोश च्या फोल्डरला पुरस्कार देण्यात आला. नॅशनल बुक ट्रस्टचे संचालक शशी शर्मा यांनी प्रकाशक संघाच्या या उपक्रमाचा गौरव केला.



**टी बुक क्लब १३** **नोंदणी चालू!**

**टी बुक क्लब १३ मधून प्रकाशित होणारी पहिली चार पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| सिटी ऑफ बोन्स | मायकेल कॉनेली | अजित ठाकूर |
| गॉन फॉर गुड | हर्लन कोबेन | अजित ठाकूर |
| ओमेरता | मारिओ पुझो | अनिल काळे |
| सन्स ऑफ फॉर्च्युन | जेफ्री आर्चर | अजित ठाकूर |

**आजच सभासद व्हा!** **सभासद फी ५० रु.**

# श्रद्धांजली



*** तत्त्वज्ञ जॅक डेरिदा**

'विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सर्वात लोकप्रिय तत्त्वज्ञ' अशी नोंद इतिहासात करून जॅक डेरिदा अंतर्धान पावले आहेत.

तत्त्वज्ञानाची प्रस्थापित मांडणी हलवून टाकणारे आणि ज्ञानाच्या विशाल विश्वात निर्माण केलेली हलचल अखेरच्या क्षणापर्यंत ताजी ठेवणारे डेरिदा अखेरच्या मुलाखतीत म्हणाले होते,'मला काही मृत्यूचे स्वागत करण्याची कला शिकता आली नाही. हे शहाणपण शिकण्याबाबत तरी मी अडाणीच राहिलो,' स्वादुपिंडाचा कर्करोग झालेल्या डेरिदांना अज्ञाताची हाक नक्कीच जाणवली असेल. तिचा अर्थ लावताना 'जगायला शिकणे आणि मरायला शिकणे यात काही फरक नाही' असे त्यांनी सांगून टाकले. त्यांच्या डी-कन्स्ट्रक्शन (वि-रचना)च्या थिअरीइतकेच काहींना हे वाक्य अगम्यही वाटले असेल. पण आपला वि-रचनेचा सिद्धान्त सांगून पूर्ण झाला आहे, असे डेरिदा यांनीही कधी म्हटले नाही. हा सिद्धान्त भाषेतून तत्त्वज्ञानात शिरला आणि मग त्याने भाषाशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, कायदा, आर्किटेक्चर या सगळ्या ज्ञानशाखांना कवेत घेतले. वि-रचनेचा सिद्धान्त सोपा करायचा तर 'साहित्याचा अर्थ लावताना भाषेचे अनेक स्तर लक्षात घ्यावे लागतात. लेखक त्याच्या लेखनाच्या अर्थाचा 'मालक' होऊ शकत नाही. लेखनातला प्रत्येक तुकडा घेऊन त्याची 'वि-रचना' करणारे तज्ज्ञ जो अर्थ शोधतील तो कदाचित लेखकाला अभिप्रेतही नसेल.' हा सिद्धान्त मानणाऱ्या अभ्यासकांनी थेट प्लेटो, ॲरिस्टॉटल, शेक्सपिअर आणि फ्रॉइड यांच्या लेखनातील पूर्वग्रहांवर बोट ठेवले! स्त्रीवाद्यांनीच नव्हे तर समलिंगी चळवळीच्या समर्थकांनीही डेरिदांना आपले मानले. वास्तुशिल्पज्ञांनी वि-रचनेचे तत्त्व मानून भौमितिक रचनेचे नियम धुडकावले आणि विलक्षण इमारती उभ्या केल्या. वूडी ॲलन यांनी आपल्या एका चित्रपटालाही 'डिकन्स्ट्रक्टिंग हॅरी' असे नाव दिले. ''तुम्ही अनाकलनीय लिहिता'' असा आरोप करणाऱ्यांना 'मग माझ्या भाषणांना हजारो श्रोते का जमतात?' असा प्रश्न विचारून डेरिदा निरुत्तर करत. डेरिदा तत्त्वज्ञ होते, पण हस्तिदंती मनोऱ्यातले नव्हेत. अल्जेरियातून फ्रान्समध्ये आलेल्या निर्वासितांच्या लढ्यात ते हिरीरीने उतरले. १९३०मध्ये अल्जेरियात त्यांचा जन्म झाला, तेव्हा तो फ्रान्सचाच भाग होता. ज्यू घरात जन्मलेले डेरिदा पॅरिसमध्ये शिकले. फ्रान्सप्रमाणे अमेरिकेतही अध्यापन केले. त्यांच्या लेखनाचा झपाटा असा की ४० पुस्तके आणि शेकडो लेख लिहूनही त्यांना आणखी लिहायचे होते. सत्तर आणि ऐंशीच्या दशकात तर डेरिदांनी अमेरिकेचे विचारविश्व पुरते झपाटून टाकले. इतके की मायदेश फ्रान्सपेक्षा त्यांचा अमेरिकेतच अधिक दबदबा असे. डेरिदांना नावे ठेवणारे कमी नव्हते, पण आधुनिक तत्त्वज्ञानात त्यांनी झंझावात आणला. अशा सृजनशील झंझावाताचे नाव अनेकदा सुचविले जावे, पण प्रत्यक्ष पुरस्कारापासून दूर राहावे हे 'नोबेल'चे दुर्दैव!

*** 'सुपरमॅन' ख्रिस्तोफर रिव्हचे निधन**

'सुपरमॅन' चित्रपटांच्या मालिकेचा हिरो म्हणून गाजलेला, नऊ वर्षांपूर्वी झालेल्या जीवघेण्या अपघातानंतर मणक्याच्या विकारामुळे चाकाच्या खुर्चीला खिळून राहिलेला हॉलिवूडचा उमदा; पण दुर्दैवी अभिनेता ख्रिस्तोफर रिव्ह (वय ५२) याचे १९ ऑक्टोबरला हृदयक्रिया बंद पडून निधन झाले.

अर्धांगवायू झालेल्या रिव्हची एक जखम चिघळल्यामुळे त्याची प्रकृती नाजूक बनली होती. नंतर त्याच्या सर्व शरीरातच जंतुसंसर्ग झाला. रिव्हला हृदयविकाराचा जोरदार झटका आल्यानंतर तो कोमात गेला. मृत्युसमयी त्याची पत्नी डॅना त्याच्यासमवेत होती.

'सुपरमॅन' अशीच ओळख असलेला रिव्ह या चित्रमालिकेच्या यशामुळे अनेकांच्या गळ्यातील ताईत बनला. मे १९९५ मध्ये व्हर्जिनियात कल्पेपर येथे घोडेस्वारीच्या स्पर्धेत भाग घेताना, घोड्याने फेकून दिल्याने रिव्हची मान मोडली होती. तेव्हापासूनच तो खुर्चीला खिळून होता. 'सुपरमॅन'चे काम करणाऱ्या या उमद्या अभिनेत्यावर अशी वेळ आली, तरी त्याच्या हजारो चाहत्यांनी त्याला कधीच अंतर दिले नाही. त्याच्या या शेवटच्या आजारातही तो बरा व्हावा, म्हणून चाहत्यांच्या शुभेच्छांचा ओघ अखंड सुरूच होता.

*** वसंतराव एकबोटे यांचे निधन**

जुन्या पिढीतील सोलापूरचे ज्येष्ठ पत्रकार वसंतराव एकबोटे (वय ७५) यांचे १ नोव्हेंबरला अल्प आजाराने निधन झाले.

वसंतराव एकबोटे यांनी जवळपास पस्तीस वर्षांहून अधिक काळ त्यांनी पत्रकारिता केली. आचार्य प्र. के. अत्रे यांच्या 'मराठा'चे ते जिल्हा प्रतिनिधी होते. आकाशवाणीचेही दहा वर्षे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले.

*** मोडी लिपीचे तज्ज्ञ वा. भ. राडकर यांचे निधन**

मोडी लिपीचे तज्ज्ञ वासुदेव भ. राडकर (वय ९०) यांचे २ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुलगे, एक मुलगी असा परिवार आहे. शिक्षण प्रसारक मंडळीचे उपाध्यक्ष ॲड. सुनील राडकर यांचे ते वडील होत.

❐

## मूल व पुस्तकांची मैत्री करवणारी 'अविक'बाल वाचनालयाची मोहिम -

**सुरेखा पाणंदीकर**

मुलांना हल्ली वाचायला नको ही तक्रार सर्व पालक, शिक्षक, ग्रंथपाल व प्रकाशक व लेखक करत असतात. पण ह्याला जबाबदार कोण? ह्याचा विचार विशेष केला जात नाही. मुलं तेव्हाच पुस्तकं वाचतील जेव्हा त्यांना ती सहज मिळू शकतील. त्यांच्या आजूबाजूला जर पुस्तकं असतील, त्यांना ती वाचून दाखवली, गोष्ट सांगून पुस्तकातली चित्रं दाखवून वाचनाची आवड निर्माण केली तर मुलं नुसती वाचतच नाहीत तर पुस्तकांसाठी भांडतात हा अनुभव आहे. पण हे सगळं करायचं कोणी? खरं म्हणजे सुरवात अगदी मूल एक ते दीड वर्षाचं झाल्यापासून घरातून व्हायला पाहिजे. पण आईवडिलांना वेळ नाही ही सबब सांगितली जाते. स्वत:साठी, त्यांच्या पार्ट्यांसाठी वेळ असतो पण स्वत:च्या मुलांसाठी १५-२० मिनिटे द्यायला तयार नाहीत ही शोकांतिका असली तरी सत्यस्थिती आहे. आपल्यासाठी मासिकं आणतात, सासबहू किंवा तत्सम दूरदर्शनमालिका पहाण्यासाठी सर्व वेळापत्रकं - स्वयंपाक सुद्धा- बदलू शकतात. आया आणि बाबा कामावरून इतके दमून (?) येतात की त्यांना आरामखुर्चीवर बसून सिगरेट व चहा पीत 'रिलॅक्स' व्हायचं असतं आणि दूरदर्शनमालिकाही पाहायच्या असतात. त्यामुळे छोट्या गोपूला किंवा साधनाला पुस्तक वाचायची गोडी लावायचं काम कसं होणार?

शाळेतून 'वाचाल तर वाचाल' च्या घोषणा होतात. वाचनालयातील पुस्तकं मात्र कुलपातून बंद! लायब्ररीयन स्वत:चं काम व जबाबदारी - अर्थात शाळेतून वाचनालय असलं तर- शक्यतो टाळतात. कारण पुस्तकं फाटली हरवली तर भरणार कोण त्याची किंमत? शाळेतील फळा, फर्निचर, प्रयोगशाळेतील सामान फुटलं तुटलं तर नवं येतं; पण पुस्तक? काहीतरीच काय? पण आता थोडा बदल झाला आहे. कारण दोन वर्षापूर्वी औरंगाबादमध्ये नॅशनल बुक ट्रस्ट व.यू.एन.डी.पी. यांनी मिळून महाराष्ट्र शिक्षण खात्याच्या सहकार्याने शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतली होती, तेव्हा त्या वेळच्या शिक्षण खात्यांच्या डायरेक्टरांनी आश्वासन दिलं होतं की पुस्तकांशी दाखवला जाणारा सावत्रपणा संपेल व इतर शैक्षणिक सामानाप्रमाणे पुस्तकं ही फाटली किंवा हरवली तर शिक्षण खातं वाचनालयातील प्रमुख किंवा शिक्षकांना जबाबदार न धरता नवी पुस्तकं पुरवतील. त्याच वेळी वाचनालयातील गोष्टींनी व इतर पुस्तकांनी पाठ्यक्रम कसा मनोरंजक करता येतो व प्राथमिक शिक्षणचा दर्जा कसा सुधारता येतो हे आम्ही करून दाखवलं होतं.

पण आज अशा अनेक शाळा आहेत जिथ वाचनालयं नाहीत. असली तरी आठवड्यातून फक्त एक ४० मिनिटांचा तास वाचनालयाचा असतो. त्याच १० मिनिटे. जाण्यायेण्यात जातात व राहिलेल्या ३० मिनिटात ७० मुलांना पुस्तकं देणं घेणं हे एका व्यक्तीला कठिणच नाही तर अशक्य आहे. म्हणून सार्वजनिक बालवाचनालयाची मोहिम आम्ही दिल्लीपासून सुरू केली. असोसिएशन फॉर रायटर्स अँड इलस्ट्रेटर्स फॉर चिल्ड्रन्स (अविक) या आमच्या संस्थेने हे काम हाती घेतल. साने गुरुजी कथामालेच्या संस्कारात वाढली असल्यामुळे मीच ही योजना मांडली आणि सुरवातही केली. आजही मी ती चालवत आहे. ९ एप्रिल १९८३ ला चिल्ड्रेन्स बुक ट्रस्टचे संस्थापक व प्रसिद्ध व्यंगचित्रकार शंकर पिल्ले यांच्या हस्ते ९ वाचनालये उघडली. वाचनालय म्हणजे एका बॅगेत १५० ते २०० पुस्तके, एक रजिस्टर, आजूबाजूला वाटण्यासाठी पत्रके, वाचनालयाचा सभासद होण्यासाठी लागणारे फार्मस्. ते फॉर्म्स मुलंच भरून देतात. आणि घरासमोर अगर जिथं बालवाचनालय सुरू करायचं असेल तिथं लावायला एक बोर्ड.

अविक बालवाचनालय सुरू करायला प्रथम 'अविक'चं आजीव सदस्य व्हावं लागतं. मुलांची व पुस्तकांची आवड आणि त्यासाठी काम करण्याची निष्ठा एवढीच अपेक्षा किंवा अटी. हं - एक विसरले, हे सर्व स्वयंसेवकवृत्तीने करायचं. कारण त्यासाठी मानधन वगैरे काही देता येत नाही.

सुरवातीला आम्ही मित्रमंडळीकडून, प्रकाशकांकडून २५०० पुस्तकं गोळा केली. प्रकाशकांनी एक सेट देणगी म्हणून दिला आणि इतर पुस्तकांवर ३० टक्के सूट दिली. त्यानंतर ह्या पुस्तकांची नोंद करून मध्यवर्ती वाचनालय म्हणजे 'अविक' च्या नेहरू हाऊसमधील ऑफिसमध्ये ठेवली.

आठवड्यातून दोन दिवस प्रत्येकी दोन तास वाचनालय असतं. आजूबाजूच्या घरांतून मुलांमध्ये पत्रकं पोचली की मुलं वाचनालयाचे सदस्य होण्यासाठी येतात. वाचनालयाची फी फक्त ५रुपये महिना; म्हणजे ५ रुपयांत १० पुस्तकं मुलांना वाचायला मिळतात. डिपॉझिट वगैरे काही नाही. पालकांकडून फक्त आश्वासनाची सही घेतली जाते की पुस्तक फाटलं किंवा हरवलं तर त्याची भरपाई ते करतील, तसंच एक आठवड्यात पुस्तक परत नाही केलं तर मुलांना २५ पैसे दिवसाला दंड भरावा लागतो. पुस्तक वाचून झालं नसेल तर ते पुन्हा नोंदून नेऊ शकतात. हे केवळ शिस्त लावण्यासाठी.

ही आमची बालवाचनालये घरातून किंवा मुलांबरोबर काम करणाऱ्या संस्थांमध्ये चालतात. उदा. बांधकाम करणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी काम करणाऱ्या 'निर्माण' व मोबाइल क्रेश, किंवा झोपडपट्टीतून काम करणाऱ्या 'अंकुर', 'आधार', किंवा स्ट्रीटचिल्ड्रन, स्टेशनवर फिरणाऱ्या कचरा उचलणाऱ्या मुलांच्या अनुभव व बटरफ्लाय यासारख्या संस्था यांमध्ये आमची बालवाचनालयं आहेत.

आमच्या बालवाचनालयाचं वैशिष्ट्य म्हणजे इथे कडक इस्त्रीच्या चेहऱ्याचे ग्रंथपाल किंवा शिस्तीसाठी रागावणारे शिक्षक नाहीत. इथं वाचनालय चालवणारी आँटी, मावशी, दीदी किंवा ताई, दादा अगर भैया असतो.

आमच्या बालवाचनालयात मुलांना पुस्तकं निवडण्याचं स्वातंत्र्य आहे. इथं आई वडील किंवा इतर मोठी माणसं हे पुस्तक वाच, तुला अभ्यासात मदत होईल हे सांगत त्यांच्या मर्जीचं पुस्तक घ्यायला लावू शकत नाहीत. कारण इथं फक्त बालवाचकच येऊ शकतात. मोठी लोकं फक्त जेव्हा काही कार्यक्रम असतात तेव्हाच येतात.

त्याच्या आवडीचं पुस्तक घेऊ शकल्यामुळे आम्हालाही कळतं की मुलांना काय

वाचायला आवडतं आणि कशा तऱ्हेची पुस्तकं आपण लिहली पाहिजेत??

बालवाचनालयात कथाकथने, कथावाचन, कथांचं नाट्यरूपांतर, कथा-चित्रकारी व प्रश्नमंच यासारखे कार्यक्रम होतात. ज्यांनी मुलांना पुस्तक किंवा लिखित रूप हे मूळ कसं आहे - नाटके, चित्रपट टी.व्ही मालिका सर्व माध्यमांचं मूळ पुस्तक हे आहे व ते वाचलंच पाहिजे हा मंत्र सहज मिळतो.

तसंच मुलांना पुस्तक वाचल्याबद्दल व लायब्ररियनला पुस्तक वाचण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल बक्षीसंही देण्यात येतात.

दरवर्षी प्रत्येक बालवाचनालयातून नियमित वाचणाऱ्या मुलांना 'वर्षाचा उत्तम वाचक' म्हणून पुरस्कार चांगलं काम करेल त्याला उत्तम लायब्रेरीयन चा पुरस्कार मिळतो.

एकदा १५०-२०० पुस्तकं दिल्यावर काम संपत नाही. तर ती पुस्तकं मुलांनी वाचून झाल्यावर लायब्रेरियन ती परत देऊन सेंट्रल ऑफिसमधून नवी पुस्तकं घेऊन जाऊ शकतो. म्हणजे मुलांना नवी नवी पुस्तकं वाचायला मिळतात मुलं वाचनालयात येतात. वाचनालय बालप्रिय करण्यासाठी वाचनालय चालविणाऱ्या लायब्रेरियन्सची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांना आम्ही प्रशिक्षण देतोच पण आमचे अविकचे इतर सदस्यही मदत करतात. कारण मुलांचा उत्साह कायम ठेवून मुलं व पुस्तकं ह्यांचं नातं टिकवायचं असते. अन एकदा का मुलांना वाचनाची आवड किंवा चटक लागली की मग ती जीवनभर पुस्तकमित्र झालीच म्हणून समजा.

ह्या अशा अगदी घरगुती व खेळीमेळीच्या वातावरणामुळे आणि अविक सदस्यांच्या निष्ठापूर्ण कार्यामुळे आज ८४ बालवाचनालये आहेत. आमच्या बालवाचनालयाला मोठी इमारत अगर टेबलखुर्च्या किंवा जागेबद्दल कुठलीही अडचण येत नाही. आमची बालवाचनालये एका बॅगेत बंद असतात. त्यामुळे ती डायनिंग टेबल, जिन्याच्या पायऱ्यांवर, झाडाखाली सतरंजीवर किंवा एखाद्या कोपऱ्यात दोरीवर अडकवूनही बॅग उघडून सुरू होऊ शकतात. न्यूयॉर्कमधल्या आधुनिक बालवाचनालयात गोष्टी सांगताना जेव्हा मी त्यांना झाडाखाली वाचनालयाचा फोटो दाखवला तर ती मुलं म्हणाली: किती गम्मत येत असेल मोकळ्या हवेत पाखरांच्या गाण्याचं पुस्तक वाचताना! तेव्हा जागा नाही हे कारण अडवू शकत नाही आम्हाला.

सुरवातीला जी मुलं येतात ती बॅगेतून पुस्तकं काढून वाचनालय सजवतात आणि शेवटी येणारी मुलं वाचनालय पुन्हा बॅगेत बंद करतात. जागेपेक्षा महत्त्व आहे पुस्तक व मुलांना एकत्र आणणं, त्यांची मैत्री करून देणं याला. अशी वाचनालयं दिल्ली व दिल्लीबाहेर हिमालयातील बद्रीकेदारपासून केरळातील त्रिवेन्द्रम, पंजाबच्या खन्ना गावापासून ते शिलांग मेघालय, अरुणाचल व जोहराट पर्यंत आमचे अविक सदस्य चालवत आहेत.

पुस्तकांनी केवळ मनोरंजन होते असे नाही तर अभ्यासातलं त्यांचं लक्ष वाढून त्यांची स्मरणशक्ती चांगली होते, त्यांचं सामान्यज्ञान वाढत जातं व पुस्तकांबरोबर घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमातून त्यांच्यातील सुप्त कलावंतालाही वाव मिळतो हे आम्ही दाखवले व समजून दिले.

पुस्तकांचा आणखीन एक उपयोग आहे. दंगे, भूकंप, पूर ह्यामुळे निराधार व असुरक्षित झालेल्या मुलांना पुन्हा सामान्य करण्यासाठी पुस्तकांचा उपयोग करता येतो हेही प्रयोग



आम्ही केले. गुजरातच्या भूकंपात सर्वस्व हरवलेला अनाथ मुलगा. त्याची स्मृती जाऊन तो एक 'रोबो' झाला होता, त्याची आई त्याला गांधीजींवरील पुस्तक (सबका साथी सबका दोस्त) वाचून दाखवायची. तेव्हा ''आई सापडली - बा मिल गई'' म्हणून पुस्तक पोटाशी धरून रडला. आपल्या अबोल किंवा मूक कोषातून बाहेर आला आणि आता सामान्य झाला आहे. गुजरातच्या दंग्यामुळे मानसिक दृष्ट्या आजारी झालेल्या कश्मीरच्या लढ्यात अनाथ व मानसिक दबावामुळे असुरक्षित झालेल्या मुलांसाठी तसेच वाचनालयातील पुस्तकांचा व कथाकथनाचा उपयोग झाला. करण्याचा प्रयत्न सफल झाला आहे. हे विचार नुकत्याच 'केपटाउन' साऊथ अफ्रिका येथे झालेल्या विश्वबालसाहित्य सम्मेलनात मी पेपर वाचून मांडले तेव्हा त्यांनी खूप कौतुक केले. हे प्रयोग आमच्याकडे आम्ही करू असे आश्वासन दिले. म्हणूनच बालवाचनालयाची चळवळ देशव्यापी व्हावी व ज्या संस्था अशी बालवाचनालये चालवतात त्या सर्वांनी एकत्र येऊन विचार व अनुभव यांची देवाणघेवाण करावी. बालपुस्तक वाचनालयाच्या वाटेतील अडचणी दूर करण्याचे उपाय शोधावे ह्या साठी २९-३० एप्रिल २००५ रोजी ''नॅशनल कन्व्हेन्शन ऑन चिल्ड्रन्स लायब्ररीज'' आम्ही दिल्लीत आयोजित करत आहोत. प्रकाशक, लेखक, वाचक, शिक्षक, शिक्षण विभाग ह्या सर्वांच्या सहकार्याने बालपुस्तकालयाची चळवळ देशव्यापी व्हावी आणि आमचं स्वप्न ''देशातील प्रत्येक मुलाला मिळावं पुस्तक वाचायला'' प्रत्यक्षात यावं अशी इच्छा आहे.

**सुरेखा पाणंदीकर**
डब्ल्यू २ ग्रीन पार्क, नवी दिल्ली १६
फोन नं. ०११-२६५१८७२२

## छोट्या मुलांना आवडतील अशी चित्रमय गोष्टींची पुस्तके









| | | |
|---|---|---|
| **पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील बोधपर गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील रोचक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **जातक कथा : मनोरंजक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : प्रेरक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : रोचक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : शिक्षाप्रद** | निर्मला सारडा | २५ |
| **राजा हरिश्चन्द्र** | संपादक : अनंत पै | २० |
| **अभिमन्यू** | संपादक : अनंत पै | २० |
| **विक्रमादित्य** | संपादक : अनंत पै | २० |
| **छत्रपती शिवाजी** | संपादक : अनंत पै | २० |




# वाचकांचा प्रतिसाद

**स.न.वि.वि.**

ऑक्टोबरचा अंक मिळाला. ४६व्या पानावर माधव मोर्डेकरांच्या निधनाची बातमी वाचली. धक्काच बसला. सगळ्या जुन्या आठवणी चाळवल्या गेल्या.

मधुदादाचा माझा परिचय खूप जुना. (१९३८ ते १९४४) मी कोल्हापुरात लक्ष्मीपुरीत रहात होते. आमच्या घराच्या जरा पुढे समोर चाळ होती. तिथं मोर्डेकर कुटुंब रहायचे. त्याची धाकटी बहीण लीला (आता लीला शिंगटे) माझी मैत्रीण. मधुदादा माझ्यापेक्षा ५-६ वर्षांनी मोठा.

त्याच्याशी आम्ही कधी बोलायला जात नसू, पण मे महिन्यात अक्कांच्या (त्यांच्या मातोश्री) माजघरात दोरीवर साड्या टाकून आम्ही पडदा करत असू आणि तिथे कार्यक्रम करत असू. तेव्हा मधूदादाचं गाणं व्हायचं-

'...बागड बम् बम् बम
वाजे डमरू वाजे डमरू
शिक्षकांचा नाच आता वर्णन करू!
ड्रिल मास्तर नजर करडी, आवाज भरडा
लेफ्ट राईट, लेफ्टराईट सांगुन सांगुन घसा कोरडा.'

हातवारे, नकला करत तो हे गाणं छान रंगवत असे. आम्ही टाळ्या वाजवून दाद देत असू.

गल्लीतल्या क्रिकेटचा तो कॅप्टन. जिंकून आले की कोपऱ्यावरून सगळी टीम ओरडत यायची: 'जिंकलो जिंकलो...' आम्ही आनंदानं नाचत असू... कितीतरी आठवणी.

दहा वर्षांपूर्वी मी कार्यक्रमानिमित्त कोल्हापूरला आले होते. तेव्हा वि. आ. बुवा, राजा पारगावकर यांच्यासह आम्ही त्याला भेटायला गेलो. रमादेवी (माझं माहेरचं नाव) भेटायला आली याचा त्याला केवढा आनंद झाला होता! अगदी ताजे ताजे पेढे त्यानं खाऊ घातले होते.

माझं आत्मचरित्र वाचून त्यानं कौतुकाचं पत्र टाकलं होतं. आपलं एक पुस्तकही भेट दिलं होतं... आता सगळं संपलं. खूप वाईट वाटलं. कुणाला कळवू सुचेना. आपण त्याचे प्रकाशक स्नेही. म्हणून हे पत्र आपल्याला लिहिलं.

माझी श्रद्धांजली!

**गिरिजा कीर,**
मुंबई ५१.



**स.न.वि.वि.**

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा दिवाळी २००४ चा अंक वाचला. अंकातल्या विषयाच्या वैविध्यामुळे तसेच विषयानुसारच्या उत्कृष्ट लेखांमुळे अंक वाचनीय झाला आहे. त्यामुळे 'ग्रंथजगत'ने मराठी दिवाळी अंकांच्या परंपरेत स्वत:चे वेगळे असे स्थान पटकावले आहे असे म्हणता येईल.

विशेषत: द. ता. भोसले, डॉ. सुवर्णा दिवेकर, महादेव मोरे यांनी व्यक्तिचित्रे विशेष दाद देण्याजोगी आहेत. 'नक्षत्रांचे देणे' हा विभाग प्रत्येकानेच गांभीर्यपूर्वक विचार करण्याजोगा आहे. त्यातला डॉ. श्यामा घोणसे यांचा लेख मनाला सुखद दिलासा देणारा आहे.

बालविभागातले 'दोस्त छोटे, नाव मोठे'ही लेखमाला आवडली. भाषावापराबाबत बालविभागात सुधारणेला वाव असला तरी एकूण अंकाचा विचार करता अंक वाचनीय झाला आहे. पुढच्या दिवाळी अंकाबाबतही अपेक्षा आहेतच त्यासाठी शुभेच्छा.

**संजीवनी शिंत्रे, पुणे**

* * *

**स.न.वि.वि.**

मेहता ग्रंथजगतचा दीपावली अंक २००४ मिळाला. अंकातील तीनही विषय आणि या तीनही विषयांना लेखकांनी दिलेला आविष्कार न्याय. या सुंदर गुंफणीने अंक अतिशय सुरेख झाला आहे. अंकातील प्रमोदिनी वडके-कवळे, स्वाती देशपांडे, सुनीता लोहोकरे, मालती नांदापूरकर आणि माधवी कुंटे यांचे लेख उल्लेखनीय, काही नामवंतांबरोबर नवीन प्रतिभेला दिलेले स्थान आश्वासक आहे.

**डॉ. सौ. सुवर्णा दिवेकर,** पुणे - ४११ ००४.

* * *

**स.न.वि.वि.**

'ग्रंथ जगत' मराठीचे ।
ग्रंथजगत मेहतांचे ।
ग्रंथ जगत सर्वांचे-।
दीपावलित फुलावे-।।१।।

ग्रंथजगता मधुन सारे।
ग्रंथजगताचे नवे तारे।
ग्रंथजगत काही हसरे।
दीपावलित प्रसिद्ध व्हावे ।।२।।


सुखसमृद्धि यशकीर्ति।
ग्रंथावर ग्रंथ निर्मिती।
सर्वांवर सदैव प्रीति।
दीपावलित दिसावे ।।३।।

पणतीच्या ज्योतिमधुन।
प्रकाश यावा आनंदून।
उत्साह यावा ओसंडून।
ग्रंथातून प्रेम फुलावे ।।४।।

ग्रंथ पाहता आनंद मन।
स्थिर व्हावे वाचक मन।
दीपावलिचे शुभचिंतन।
भगवंत प्रसाद समजावे ।।५।।

**मधु मिलिंद**
हडपसर, पुणे २८.

# बालनगरी



## अनुक्रमणिका


न्यायमूर्तींचा न्याय ५३

मार्ग शोधा ५५

स्पर्धा-खेळ ओळखा ५६




## न्यायमूर्तींचा न्याय









# मार्ग शोधा

**खालील चित्रातील मुंगीला साखरेच्या दाण्यापर्यंत जाण्याचा मार्ग शोधा**



## ऑक्टोबरच्या स्पर्धेचा निकाल

**लपलेल्या संख्या शोधा चे यशस्वी स्पर्धक**


१. **इशिता वैभव पाठक -** इयत्ता १ ली, द्वारा व्ही.एम.पाठक 'प्रेरणा' ए/१२६, विवेक नगर, बसमथ रोड, परभणी ४३१ ४०१.

२. **पियुष ए. भांडेकर -** इयत्ता ३ री, सईनगर, कार्मेल हायस्कूलच्या मागे, गडचिरोली ४४२ ६०५.

३. **अभिषेक दिलीप भाते -** इयत्ता ८ वी, द्वारा श्री. के. एन. देशमुख एल ५७ व्ही एच बी कॉलनी, गोरक्षण रोड, अकोला-४४४ ००४

**आपले बक्षीस लवकरच पाठवत आहोत.**

# खेळ ओळखा स्पर्धा



**अचूक उत्तरे पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस! उत्तर पाठवताना आपले नाव, पत्ता व इयत्ता लिहायला विसरू नका.**

**मुदत १५ फेब्रुवारी २००५ पर्यंत.**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०

# ऑक्टोबरच्या स्पर्धेचा निकाल

## वेड्याचे चित्र स्पर्धेचे यशस्वी स्पर्धक

१. **यशोधन लोवलेकर** - इयत्ता २री, १२२० सदाशिव पेठ, पुणे ३०.

२. **मुग्धा संजीव मुळे** - इयत्ता २ री, ए २/२९ राजमयूर सोसायटी, एरंडवणे, पुणे ४.

३. **नीलांबरी दीपक ओढेकर** - इयत्ता ६ वी, २/१३ अंबर, नरसिंह नगर, गंगापूर रोड, नासिक ४२२ ०१३.

## आपले बक्षीस लवकरच पाठवत आहोत.